- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
✔ २४ कॅरेट : १,४२,७०० /-
✔ २२ कॅरेट : १,३१,३५० /-
✔ चांदी : १,९८,३००/-

दैनिक
सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

Hotel Mai VilLa
Ac/Non Ac Room Available
Add : Velahari, Outer Ring Road, Nagpur
- Contact No -
7796116694
9730107075

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : सोमवार, २६ ऑक्टोबर २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : ३१६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

थोडक्यात

जयपूरमध्ये अपघातात नाशिकचे ४ भाविक ठार

जयपूर : राजस्थानातील धार्मिक यात्रेसाठी गेलेल्या बागलाण तालुक्यातील अजमेर सौंदाणे येथील मगर कुटुंबातील भाविकांच्या टेम्पो ट्रव्हलरला जयपूर-अजमेर राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ४८ वर भीषण अपघात झाला. जयपूरजवळील बगरू पुलावर शनिवारी मध्यरात्री सुमारे १ वाजून ५० मिनिटांच्या सुमारास हा अपघात घडला. या दुर्घटनेत चौघांचा जागीच मृत्यू झाला, तर २५ जण जखमी झाले आहेत. जखमींपैकी सात ते आठ जणांची प्रकृती गंभीर आहे. सर्व जखमींवर जयपूर येथील सवाई मानसिंग रुग्णालयात उपचार सुरू असून या दुर्घटनेमुळे अजमेर सौंदाणे परिसरात शोककळा पसरली आहे.
या दुर्दैवी घटनेची माहिती मिळताच नाशिकचे पालकमंत्री तथा राज्याचे मंत्री गिरीश महाजन यांनी तातडीने मदतकार्याच्या अनुषंगाने पुढाकार घेत राजस्थानचे राज्यपाल हरिभाऊ बागडे यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधला. अपघातातील मृत व्यक्तींचे शवविच्छेदन लवकरात लवकर पूर्ण करून त्यांचे पार्थिव नातेवाईकांच्या ताब्यात देण्याबाबत संबंधित यंत्रणांना सूचना द्याव्यात, अशी विनंती त्यांनी राज्यपालांकडे केली. या भीषण अपघातात सेवानिवृत्त कृषी अधिकारी दीपक मगर (६५), संदीप मगर(५५) आणि महेश मगर (४५) यांच्यासह आणखी एकाचा मृत्यू झाला.

'टोरेंट'साठी वृक्षतोडीला विरोध

६०० एकरमधील झाडे कापणार असल्याचा विरोधक व निसर्गप्रेमींचा आरोप

आदित्य ठाकरेंची सरकारवर टिका



वृत्तसंस्था, रायगड
रायगड जिल्ह्यातील कर्जत तालुक्यात प्रस्तावित असलेल्या टोरेंट पॉवर कंपनीच्या जलविद्युत ऊर्जा साठवण प्रकल्पावरून राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षतोड होत असल्याचा आरोप करत विरोधक आणि पर्यावरणप्रेमींनी सरकारवर निशाणा साधला होता. या प्रकल्पाच्या मुद्द्यावर शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि आमदार आदित्य ठाकरे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. राज्यभर झाडांची कत्तल सुरु आहे. अदानी आणि बिल्डरसाठी हे सुरु आहे.
टोरेंट पॉवर कंपनीच्या कर्जत येथील बहुचर्चित टोरेंटो प्रकल्पात मोठ्या प्रमाणावर होत असलेल्या वृक्षतोडीमुळे पर्यावरणाचा गंभीर ऱ्हास होत असल्याचा आरोप करत आज शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे कार्यकर्ते आणि नेते प्रचंड संख्येने एकवटले आहेत. निसर्गाचे वाटोळे करणाऱ्या या प्रकल्पाविरोधात शिवसैनिकांनी आज थेट टोरेंटो प्रकल्पाविरोधात धडक मोर्चा काढला आहे. प्रकल्पाच्या नावाखाली सुरू असलेल्या बेसुमार झाडांच्या कत्तलीमुळे स्थानिक पर्यावरण धोक्यात आले असून, प्रशासनाने वाकडे डोळेझाक केल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला आहे. विकास आवश्यक आहे, पण निसर्गाचा बळी देऊन होणारा विनाश खपवून घेतला जाणार नाही, असा इशारा शिवसेना नेत्यांनी दिला आहे. आज हा मोर्चा थेट कंपनीच्या दारात धडकणार असून, जबाबदार अधिकाऱ्यांना जाब विचारला जाणार आहे. या आंदोलनामुळे कर्जत परिसरात राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.

हिंजवडी मेट्रो फक्त तारीख पे तारीख मध्ये अडकली
आमचा संघर्ष पाणी आणि वाहतूक कोंडी संदर्भात सुरु आहे. ६ सप्टेंबरला आंदोलन झालं आहे. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी ४२६ कोटी निधी जाहीर केलं आहे. पण प्रत्यक्षात कृती अजून नाही. त्यामुळं मुख्यमंत्र्यांनी केवळ निधी जाहीर करून होणार नाही, त्यांनी अंमलबजावणी सुरु करावी असेही आदित्य ठाकरे म्हणाले. हिंजवडी मेट्रो तर फक्त तारीख पे तारीख मध्ये अडकली आहे.
जुलैपासून आम्ही ऐकतोय, आता नोव्हेंबरची तारीख ऐकली, मात्र मेट्रो सुरु व्हायचं नाव का घेईना? असा सवाल आदित्य ठाकरेंनी केला. मुख्यमंत्र्यांचं विशेष लक्ष म्हणजे दुर्लक्ष म्हणायचं का? असा सवालही आदित्य ठाकरेंनी केला. तुमचं नाव अदानी असतं तर एका रात्रीत प्रश्न मिटले असते असा टोला देखील ठाकरेंनी उपस्थित केला. मी उद्या कर्जत-भीमाशंकर जंगल कत्तलची पाहणी करणार आहे. राज ठाकरे देखील जाणार असल्याचे आदित्य ठाकरे म्हणाले.

इस्त्रायलला १ तासांत मातीत गाडू



वृत्तसंस्था, तेहरान
इराण-इस्त्रायल यांच्यातील तणाव वाढला आहे. इराणची सत्ता खेचणार असा इशारा इस्त्रायली पंतप्रधान बेंजामिन नेतन्याहू यांनी दिल्यानंतर इराणकडूनही जोरदार प्रत्युत्तर देण्यात आले आहे. जर इराणच्या राष्ट्रीय सुरक्षेवर आणि हितसंबंधांवर हल्ला झाला तर एका तासापेक्षा कमी वेळात इस्त्रायल राहण्यायोग्य राहणार नाही असा इशारा इराणी संसदेतील राष्ट्रीय सुरक्षा आणि परराष्ट्र धोरण समितीचे प्रमुख इब्राहिम अझीझी यांनी दिला.
अझीझी यांनी इस्त्रायलच्या प्रमुख पायाभूत सुविधा दर्शवणारा एक नकाशाही शेअर केला. इराणच्या इशाऱ्यामध्ये पाणीपुरवठा, वीज निर्मिती, तेल शुद्धीकरण कारखाने, इंधन साठवणूक, पूल आणि वाहतूक जाळे यांसारख्या प्रमुख लक्ष्यांचा उल्लेख आहे. इराणच्या सध्याच्या राजवटीला हटवण्याचे आवाहन करणाऱ्या नेतान्याहूंच्या वक्तव्याला प्रत्युत्तर म्हणून इब्राहिम अझीझी यांनी अमेरिकन सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर एक पोस्ट केली.
इराणच्या राष्ट्रीय हितांविरुद्ध आणि सुरक्षेविरुद्ध कोणत्याही कृतीला प्रत्युत्तर दिले जाईल असा इशारा अझीझी यांनी दिला. त्यांनी शेअर केलेल्या नकाशात दिमोना अणुसंशोधन केंद्र, एक सागरी जलशुद्धीकरण प्रकल्प, वीज प्रकल्प, तेल शुद्धीकरण कारखाना आणि एक प्रमुख पूल यासह इस्त्रायलची अनेक महत्त्वाची ठिकाणे दाखवण्यात आली आहेत.
इराण केवळ युद्धाच्या काळात प्रत्युत्तर म्हणून लष्करी लक्ष्यांवरच हल्ला करणार नाही तर तो इस्त्रायलच्या अत्यावश्यक सेवा आणि पायाभूत सुविधांना लक्ष्य करण्याची धमकीही देत आहे.

पाणीपुरवठ्यापासून ते वीज प्रकल्पांपर्यंत करणार लक्ष्य
इराणने दिलेल्या इशाऱ्यांमध्ये आणि माहितीमध्ये इस्त्रायलच्या अनेक महत्त्वाच्या पायाभूत सुविधा स्थळांचा उल्लेख आहे. जर दोन्ही देशांमध्ये पुन्हा मोठ्या प्रमाणावर संघर्ष सुरू झाला तर त्याचा सर्वसामान्य लोकांच्या दैनंदिन जीवनावर किती परिणाम होऊ शकतो असा प्रश्न इराणच्या टार्गेट वादीकडे पाहून निर्माण होतो. अमेरिका आणि इस्त्रायलकडून होणाऱ्या संभाव्य नवीन लष्करी हल्ल्यांमुळे तणाव वाढलेला असतानाच इराणने ही धमकी दिली आहे.

ऑपरेशन ट्रायडंट अंतर्गत देशात ३८ ठिकाणी छापे

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी ईशान्य भारतातील अनेक राज्यांमध्ये अमली पदार्थांविरोधात करण्यात आलेल्या कारवाईची माहिती दिली. या कारवाईदरम्यान तपास यंत्रणांनी एकाच वेळी ३८ ठिकाणी छापे टाकले. या माध्यमातून अमली पदार्थांच्या मोठ्या तस्करी नेटवर्कचा पर्दाफाश करण्यात आला.
केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी रविवारी एका आंतरराष्ट्रीय अमली पदार्थ तस्करी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश करण्यात आल्याची माहिती दिली. सुरक्षा दलांनी आसाम, मिझोराम आणि मणिपूर या राज्यांमधून १८ जणांना अटक केली आहे. या कारवाईत सहभागी असलेल्या पथकाचे त्यांनी अभिनंदन केले. या पथकामध्ये केंद्रीय तपास यंत्रणांचे अधिकारी आणि तिन्ही राज्यांतील पोलीस कर्मचाऱ्यांचा समावेश होता.

यवतमाळात वसतिगृहाच्या आवारात थरार, जुन्या वैमनस्यातून दुहेरी हत्याकांड

दै. सिंहवाणी वृत्त, यवतमाळ
शहरातील गोदणी मार्गावरील जगतमंदिर परिसरालगत असलेल्या शासकीय वसतिगृहाच्या आवारात शनिवारी रात्री दोन गटांत झालेल्या वादाचे पर्यवसान दुहेरी हत्याकांडात झाले. जुन्या वैमनस्यातून झालेल्या या हल्ल्यात अभय ऊर्फ बित्तम ऊर्फ विकास दिलीप पाठोडे (२६, रा. शिदेनगर, यवतमाळ) याचा घटनास्थळीच मृत्यू झाला, तर श्री गजानन जाधव (१९, रा. मालानी नगर, यवतमाळ) याचा रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला.
या घटनेने शहरात खळबळ उडाली असून अवधूतवाडी पोलिसांनी तपास सुरू केला आहे.जुना वाद उफाळला, दोन जीवावर बेतला
शहरातील संकटमोचन मारुती मंदिर परिसरालगत असलेल्या वसतिगृहाच्या आवारात शनिवारी रात्री ९ वाजताच्या सुमारास हा प्रकार घडला. जुन्या वादातून दोन गटांमध्ये हाणामारी सुरू झाली. या वेळी धारदार शस्त्रांनी दोघांवर सपासप वार करण्यात आले. हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या बित्तम पाठोडे याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. गजानन जाधव याच्या छातीवरही वार करण्यात आल्याने तो गंभीर जखमी झाला. हल्ल्यानंतर आरोपींनी घटनास्थळावरून पळ काढला. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली.
जखमी जाधव याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, उपचार सुरू असताना त्याचाही मृत्यू झाला. एकाच घटनेत दोघांचा मृत्यू झाल्याने शहरात खळबळ उडाली आहे. घटनास्थळाची पाहणी केली असता, या परिसरात विद्यार्थ्यांचे वसतिगृह आहे. परिसरातील मोकळ्या मैदानावर मद्याच्या रिकाम्या बाटल्या, ग्लास आणि पाण्याच्या बाटल्या आढळल्याची माहिती आहे. या परिसरात रात्रीच्या वेळी काही जणांचे जमाव जमून मद्यप्राशन होत असल्याचेही स्थानिकांकडून सांगण्यात येते. मात्र, हत्याकांडाच्या वेळी नेमके काय घडले, वादाचे मूळ कारण काय होते आणि हल्ल्यात किती जण सहभागी होते, याचा तपास पोलिसांकडून केला जात आहे.
मृत अभय ऊर्फ बित्तम पाठोडे याच्याविरुद्ध यापूर्वी विविध गुन्हे दाखल असल्याची माहिती आहे. त्याच्यावर महाराष्ट्र झोपडपट्टी गुंड, धोकादायक व्यक्ती, मादक पदार्थविषयक गुन्हेगार आणि काळाबाजार करणाऱ्या व्यक्तींच्या धोकादायक कृत्यांना प्रतिबंध करण्यासंबंधीच्या (एमपीडीए) कायद्यांतर्गत दोन वेळा कारवाई करण्यात आल्याची नाही आहे. त्यामुळे या हत्येमागे नेमके कोणते वैमनस्य होते, याबाबत विविध चर्चा सुरू आहे. दरम्यान, परिसरात झालेल्या या दुहेरी हत्याकांडामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घटनास्थळावरील पुरावे, प्रत्यक्षदर्शींची माहिती आणि मृतांच्या पूर्वीच्या वादांची पार्श्वभूमी तपासून आरोपींचा शोध घेण्याचे आव्हान अवधूतवाडी पोलिसांसमोर आहे.

सालेकसा में गांजे की अवैध खेती का खुलासा

पानगांव में १७६ हरे पौधे जब्त, ११.५१ लाख रुपये का माल बरामद



दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा
तहसील के पानगांव (जिल्हा गोंदिया) में गांजे की अवैध खेती का मामला सामने आया है. २३ अक्टूबर २०२६ को प्राप्त गोपनीय सूचना के आधार पर पुलिस ने कार्रवाई करते हुए एक खेत में गांजे के १७६ हरे पौधे खेती की स्थिति में पाए. इन पौधों का कुल गीला वजन ५७.५८३ किलोग्राम बताया गया है, और पुलिस के अनुसार जब्त गांजे के पौधों की अनुमानित कीमत ११ लाख ५१ हजार ६६० रुपये है.
पुलिस के मुताबिक, गांजे के हरे पौधों का मूल्यांकन २०,००० रुपये प्रति किलोग्राम के हिसाब से किया गया था. पुलिस द्वारा दी गई जानकारी के अनुसार, इस मामले में पानगांव निवासी धर्मदास दादुराम मनघटे (उम्र लगभग ६३ वर्ष) के खिलाफ सालेकसा पुलिस थाने में नारकोटिक ड्रग्स एंड साइकोट्रॉपिक सब्सेंसेस अधिनियम की संबंधित धाराओं के तहत मामला दर्ज किया गया है. यह कार्रवाई सालेकसा पुलिस थाने के सहायक पुलिस निरीक्षक महेंद्रकुमार गवई की लिखित शिकायत के आधार पर की गई.
यह कार्यवाही गोंदिया के पुलिस अधीक्षक गोरख भामरे तथा अपर पुलिस अधीक्षक अभय डोंगरे (कैंप देवरी) के मार्गदर्शन में की गई. इस अभियान में आमगांव की उपविभागीय पुलिस अधिकारी नंदिनी चानपुरकर तथा सालेकसा पुलिस थाने के प्रभारी रवी नागोसे के नेतृत्व में पुलिस टीम ने भाग लिया. इस कार्यवाही में पुलिस हवलदार सोंजाल, तुरकर और लांडगे, पुलिस नायक कानसकर और निमजे, पुलिस सिपाही वेदक, बैस और गौतम तथा महिला पुलिस सिपाही कटरे और चौहान शामिल रहे. मामले की आगे की जांच सहायक पुलिस निरीक्षक युवराज पोहरे कर रहे हैं. यह समाचार पुलिस द्वारा जारी प्रेस नोट में दी गई जानकारी पर आधारित है, और मामले में आरोपों की पुष्टि न्यायिक प्रक्रिया के अधीन है.

मरायचंच असेल तर शेतकऱ्यांनी १०-१२ पुढाऱ्यांना मारून मरा, प्रकाश आंबेडकरांचं वादग्रस्त वक्तव्य



दै. सिंहवाणी वृत्त, बुलढाणा
दुष्काळाची भीषण परिस्थिती आणि शेतकऱ्यांचे जीवन संपवण्याच्या मुद्द्यांवरून वातावरण तापलेले असतानाच वंचितचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी एक वादग्रस्त आणि धक्कादायक वक्तव्य केलं आहे. जे लोक स्वतःचं जीवन संपवतात त्यांच्या कुटुंबीयांना भेटायला कुठल्याही पुढाऱ्याने जाऊ नये, मरायचंच असेल तर १०-१२ पुढाऱ्यांना मारा आणि मग मरा, असे खळबळजनक वक्तव्य त्यांनी केलं. तसेच शेतकरी नालायक आहे, त्यांच्यासाठी लढणाऱ्यांना तो मतं देत नाही, असंही आंबेडकर म्हणाले.
प्रकाश आंबेडकर हे बुलढाण्यामध्ये माध्यमांशी संवाद साधत होते.
प्रकाश आंबेडकर म्हणाले की, "शेतकरीच नालायक आहेत, त्याला काय करणार? शेतकऱ्यांसाठी जो नेता प्रामाणिकपणे लढतो त्याला ते मतं देत नाहीत. बुलढाण्यामध्ये रविकांत तुपकर शेतकऱ्यांसाठी लढतात, पण शेतकरी दुसऱ्यालाच निवडून आणतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी आता स्वतःच्या तोंडात मारून घ्यायला पाहिजे."राज्यातील दुष्काळी परिस्थितीवर बोलताना प्रकाश आंबेडकर म्हणाले की, अल निनो येणार हे गेल्या वर्षीपासून माहिती असूनही शासनाने अन्नधान्य, पाणी आणि चाऱ्याचे काहीही नियोजन केले नाही.
अस्मानी संकटाला तोंड कसे द्यायचे याचा कोणताही आराखडा सरकारकडे तयार नाही. जर सरकारने अन्नधान्य आणि चारा पुरवला नाही, तर नागरिकांनी मंत्री, आमदार, खासदार आणि पदाधिकाऱ्यांच्या घरासमोर लाईन लावली पाहिजे. राज्यात एका बाजूला पाऊस पडत नाही आणि दुसऱ्या बाजूला पर्यावरण नष्ट केले जात आहे, त्यामुळे लोकांनी आता कायदा हातात घ्यायला शिकलं पाहिजे."
अमरावती शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीतील भ्रष्टाचारावर बोट ठेवताना प्रकाश आंबेडकरांनी गंभीर आरोप केले. अमरावती शिक्षक मतदार संघात पाचही उमेदवारांनी प्रत्येक मतासाठी ५-५ हजार रुपये खर्च केले. ३० हजार मतांच्या हिशोबाने उमेदवारांनी तब्बल १५ कोटी रुपये खर्च केले असा आरोप त्यांनी केला. हे १५ कोटी रुपये आले कुठून? यांच्यामागे इन्कम टॅक्स किंवा ईडी लागणार आहे का नाही? असा प्रश्न त्यांनी विचारला. तसेच या निवडणुकीनंतर विद् आता शिक्षकाला 'मास्तर' म्हणण्याऐवजी '५०००' आणि शिक्षिकेला 'पैठणी' म्हटले पाहिजे, असा सणसणीत टोला प्रकाश आंबेडकर यांनी लगावला.

संपादकीय लेखणीतून...

दुष्काळ आणि खर्च कपात

राज्यातील दुष्काळ आणि तिजोरीवरचा वाढता ताण लक्षात घेता प्रशासनाने सर्व सरकारी विभागांना खर्चात २० टक्के कपात करण्याचे आदेश दिले आहेत. दुष्काळ निवारणाच्या कामासाठी जास्तीत जास्त निधी उपलब्ध व्हावा, हा या कपाती मागचा मुख्य हेतू आहे. यामुळे सरकारच्या तिजोरीवर आधीच असलेला मोठा ताण कमी करणे आणि उपलब्ध निधीचा योग्य वापर करणे शक्य होईल. दुष्काळ निवारणासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांसोबतच राज्याच्या महसुली खर्चाचे नियोजन करणे सरकार समोरचे आव्हान आहे. सर्व प्रशासकीय विभागांच्या निधी खर्चात किमान २० टक्के कपात करण्याचे आदेश वित्त विभागाने जारी केले आहेत. सरकारी खर्चात कपात करताना कोणत्या बाबींवर परिणाम होणार, याला विशेष महत्त्व आहे त्यामुळे खर्च कपातीचे निकष स्पष्ट असणे आणि आवश्यक कामांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. यंदाच्या दुष्काळाची तीव्रता १९७२ च्या दुष्काळापेक्षा खूपच भयानक असणार आहे. दरवेज टंचाई उग्र रुप धारण करीत आहे.

पुढील सुमारे ८ महिने उपलब्ध जलसाठा आणि वीज यावर काढावयचे आहेत. अर्थात त्यासाठी पाणी व विजेचा काटेकोर वापर ही सर्वांचीच जबाबदारी आहे. अशा कसोटीच्या विदारक परिस्थितीतही काही मंडळी पाण्याचा आणि विजेचा गैरवापर करताना दिसतात. नळाला मोटारी लावून शुद्ध पाण्याचा वापर वाहने धुण्यासाठी केला जातो. छतावरील टाक्या ओसंडून वाहताना दिसतात. शहरातील फुटलेल्या पाईपलाईनमधून हजारो लिटर शुद्ध पाणी वाया जाताना दिसते म्हणून पाण्याचा अपव्यय दखलपात्र गुन्हा समजून कठोर कारवाई होणे आवश्यक आहे. रेन हार्वेस्टिंग ही संकल्पना केवळ नवीन घरांनाच नव्हे तर जुन्या घरांनाही सक्तीची केली पाहिजे. अनावश्यक खर्चावर नियंत्रण ठेवण्याचा सरकाराचा प्रयत्न आहे. महसुली उत्पन्नापेक्षा सरकाराचा वाढलेला खर्च, सरकारी खर्च भागवण्यासाठी उचलावे लागणारे कर्ज आणि राज्यावरील दुष्काळाचे संकट या पार्श्वभूमीवर, खर्चात्मक कपात लावण्याच्या हालचाली सुरू असताना आता अधिवेशनात सादर होणाऱ्या पुरवणी मागण्यांनाही कात्री लागणार आहे. खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी अत्यावश्यक कामांसाठीच पुरवणी मागण्यांचे प्रस्ताव स्वीकारण्याचे निर्देश वित्त विभागाने सर्व खात्यांना दिले आहेत.

राज्य विधिमंडळाच्या हिवाळी अधिवेशनाला ७ डिसेंबरपासून नागपूरमध्ये सुरुवात होणार आहे. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पुरवणी मागण्या सादर केल्या जातात. गेल्या काही वर्षात पुरवणी मागण्यांचा आकडा हजारो कोटींच्या घरात गेला आहे. जून-जुलै महिन्यात पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात तब्बल ९७ हजार ७०६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर झाल्या होत्या. हिवाळी अधिवेशनातही मोठ्या आकाराच्या पुरवणी मागण्यांची पुनरावृत्ती होण्याची शक्यता लक्षात घेऊन वित्त विभागाने पुरवणी मागण्यांवर नियंत्रण आणण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भात वित्त विभागाने बुधवारी शासन परिपत्रक जारी केले आहे. राज्याच्या मर्यादित आर्थिक संसाधनांचा योग्य विनियोग करण्यासाठी आणि अर्थसंकल्पीय खर्चावर नियंत्रण ठेवण्यासाठी केवळ अत्यावश्यक तसेच अपरिहार्य बाबींचे पूरक मागण्यांचे प्रस्ताव स्वीकारले जाणार असल्याचे परिपत्रकात नमूद केले आहे. सर्व मंत्रालयीन विभागांनी पुरवणी मागण्यांचे प्रस्ताव ४ नोव्हेंबरपर्यंत पाठवायचे आहेत.

प्रस्ताव सादर करताना संबंधित विभागाने खर्चाची कारणमीमांसा, प्रशासकीय मान्यता, उपलब्ध निधी, मागील वर्षातील खर्च आणि चालू आर्थिक वर्षातील आर्थिक स्थितीचा तपशील सादर करण्याचे निर्देशही वित्त विभागाने दिले आहेत. आकस्मिक निधीतून मंजूर केलेल्या; पण अद्याप विधिमंडळासमोर न मांडलेल्या मागण्या, न्यायालयीन आदेशानुसार करावयाचा खर्च, नवीन बाबींवरील अत्यावश्यक खर्च, केंद्र पुरस्कृत योजना, अर्थसंकल्पात तरतूद नसलेल्या विशिष्ट खर्चाच्या बाबी आणि मंजूर तरतुदीच्या ७० टक्क्यांपेक्षा अधिक खर्च झाल्याने अतिरिक्त निधी आवश्यक असलेल्या बाबींचाच समावेश पुरवणी मागणीत करण्यात येणार आहे. जून २०२५ मध्ये ५७ हजार ५०९ कोटी, डिसेंबर २०२५ मध्ये ७५ हजार २८६ कोटी तर फेब्रुवारी २०२६ मध्ये ११ हजार ९९५ कोटी आणि जून २०२६ मध्ये ९७ हजार ७०६ कोटीच्या पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या आहेत.



'बद्र' करार आणि नवे जागतिक समीकरण

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल वर्धा

पश्चिम आशियातील सततचे तणाव, युरेशियातील बदलती सत्तास्पर्धा आणि जागतिक महासत्तांच्या पुनर्रचनेच्या पार्श्वभूमीवर आंतरराष्ट्रीय राजकारणात एका नव्या संरक्षण धृवीकरणाची स्पष्ट चाहूल लागली आहे. शीतयुद्धाच्या काळातील पारंपारिक आणि आक्रमक लष्करी आघाड्यांच्या पलीकडे जाऊन, आता विविध भौगोलिक क्षेत्रांतील देश तंत्रज्ञान, संरक्षण उत्पादन आणि आर्थिक देवाणघेवाणीच्या मुद्द्यावर एकत्र येत आहेत. या नव्या प्रवाहात सर्वात लक्षवेधी ठरलेली घडामोड म्हणजे आखाती देश, दक्षिण आशिया, युरेशिया आणि थेट आग्नेय आशिया यांना जोडणारा एक बहुपक्षीय मंच अस्तित्वात आला आहे. लष्करी ताकद, आर्थिक क्षमता, पराष्ट्र धोरणाची दिशा आणि आंतरराष्ट्रीय प्राधान्यक्रम पूर्णपणे भिन्न असलेले चार देश एकाच टेबलावर एकत्र येणे ही आधुनिक मुत्सद्देगिरीतील अत्यंत गुंतागुंतीची आणि दूरगामी परिणाम करणारी घटना मानली जात आहे. पाश्चात्त्य देशांवर शस्त्रास्त्रांसाठी अवलंबून राहण्याची पारंपरिक मर्यादा ओलांडून स्वतःची एक पर्यायी पुरवठा साखळी निर्माण करण्याची महत्त्वाकांक्षा यातून स्पष्टपणे दिसून येते.

या नव्या सामरिक समीकरणाची अधिकृत मुहूर्तमेढ कतारची राजधानी दोहा येथे रोवली गेली. २१ ऑक्टोबर रोजी झालेल्या एका उच्चस्तरीय बैठकीत कतार, तुर्की, पाकिस्तान आणि इंडोनेशिया या चार देशांच्या वरिष्ठ संरक्षण प्रतिनिधींनी एकत्र येत एका महत्त्वपूर्ण बहुपक्षीय सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. या कराराला 'बद्र सामंजस्य करार' असे नाव देण्यात आले आहे. कतारच्या संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या अधिकृत पत्रकानुसार, या भागीदारीचा पाया संयुक्त सहकार्य, धोरणात्मक भागीदारी आणि संरक्षण क्षेत्रातील स्वावलंबन हा आहे.

या स्वाक्षरी सोहळ्याला कतारचे उपपंतप्रधान आणि संरक्षण राज्यमंत्री शेख सौद बिन अब्दुल रहमान बिन हसन अल थानी, पाकिस्तानचे संरक्षण मंत्री ख्वाजा मुहम्मद आसिफ, तुर्कीचे संरक्षण मंत्री यासर गुलेर आणि इंडोनेशियाचे उपसंरक्षण मंत्री उपस्थित होते. विशेष म्हणजे, या घडामोडीच्या अवघ्या काही आठवड्यांपूर्वीच सौदी अरेबियाच्या नेतृत्वाखाली पाकिस्तान आणि तुर्की यांच्यात 'मक्का संयुक्त संरक्षण करार' झाला होता. त्यामुळे एकापाठोपाठ एक घडलेले हे दोन मोठे करार केवळ आखातापुरते मर्यादित नसून, इस्लामिक जगतातील संरक्षण उद्योगाची एक नवी साखळी उभी करत असल्याचे स्पष्ट होत आहे. मक्का करारातून सौदी अरेबियाने स्वतःचे नेतृत्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला होता, तर दोहामध्ये स्वाक्षरी झालेल्या बद्र कराराच्या माध्यमातून कतारने आग्नेय आशियातील सर्वात मोठ्या देशाला सोबत घेऊन या समीकरणाची व्याप्ती थेट पॅसिफिक महासागराच्या उंबरठ्यापर्यंत वाढवली आहे.

'बद्र करार' हा नाटोसारखा परस्पर लष्करी संरक्षणाची हमी देणारा करार नसून, तो प्रामुख्याने संरक्षण उत्पादन, तंत्रज्ञान देवाणघेवाण आणि संयुक्त संशोधनावर आधारित एक औद्योगिक आणि लष्करी आराखडा आहे. या चारही देशांकडे असलेल्या वेगवेगळ्या क्षमतांची सांगड घालणे हे या कराराचे मुख्य सूत्र आहे. तुर्कीकडे मानवरहित लढाऊ विमाने, आधुनिक ड्रोन तंत्रज्ञान, इलेक्ट्रॉनिक युद्धप्रणाली आणि प्रगत एरोस्पेस उद्योगाचे कौशल्य आहे, जे त्यांनी अलिकडच्या संघर्षांमध्ये यशस्वीपणे सिद्ध केले आहे; कतारकडे मोठ्या प्रमाणावर आर्थिक भांडवल आणि आधुनिक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत; पाकिस्तानकडे पारंपारिक शस्त्रनिर्मिती कारखाने, क्षेपणास्त्र निर्मितीचा अनुभव आणि अणुसज्ज सैन्याचे मोठे मनुष्यबळ आहे; तर इंडोनेशियाकडे जहाजबांधणी, विमान दुरुस्ती आणि आशिया-पॅसिफिक क्षेत्रातील विस्तीर्ण औद्योगिक पायाभूत सुविधा आहेत.

या चारही घटकांचे एकत्रीकरण करून अमेरिका किंवा युरोपीय देशांकडून येणारे मानवाधिकार निर्बंध आणि शस्त्रास्त्र विक्रीवरील अटी टाळणे हा या आघाडीचा मूळ हेतू आहे. तसेच सायबर सुरक्षा, आधुनिक रडार प्रणाली, इलेक्ट्रॉनिक गुप्तचर यंत्रणा आणि सागरी मार्गांवर माहितीची देवाणघेवाण हेदेखील या सहकार्याचे महत्त्वाचे आधारस्तंभ आहेत.

या सर्व घडामोडींमध्ये नवी दिल्लीसाठी सर्वात संवेदनशील आणि चिंताजनक बाब म्हणजे भारताचा महत्त्वाचा संरक्षण भागीदार असलेल्या इंडोनेशियाचा या करारात झालेला सहभाग. भारताचा 'अॅक्ट इस्ट' धोरणात इंडोनेशिया अत्यंत केंद्रस्थानी आहे. अंदमान-निकोबार बेटांच्या जवळ असणाऱ्या मलाक्का सामुद्रधुनीच्या सुरक्षेसाठी भारत आणि इंडोनेशिया यांच्यात अत्यंत जवळचे सागरी संबंध आहेत, तसेच इंडोनेशिया भारताकडून 'ब्रह्मोस' सुपरसॉनिक क्रूझ क्षेपणास्त्र खरेदी करण्याच्या चर्चेतही अग्रेसर राहिला आहे. मात्र, आता इंडोनेशिया थेट पाकिस्तान आणि तुर्कीसारख्या भारताच्या पारंपरिक विरोधकांसोबत एकाच संरक्षण मंचावर आल्याने भारताच्या मुत्सद्देगिरीसमोर पेच निर्माण झाला आहे. इंडोनेशियासोबत अतिसंवेदनशील संरक्षण तंत्रज्ञान सामायिक करताना किंवा सागरी गस्तीची गुप्तचर माहिती देताना ती माहिती पाकिस्तानच्या हाती जाण्याची शक्यता भारताला सतत सावध राहण्यास भाग पाडेल. याशिवाय, तुर्कीच्या आधुनिक ड्रोन तंत्रज्ञानाचा लाभ कतारच्या पैशांच्या जोरावर पाकिस्तानला सहज उपलब्ध झाल्यास भारताच्या पश्चिम सीमेवरील आणि नियंत्रण रेषेवरील सुरक्षा आव्हाने तात्रिकदृष्ट्या अधिक गुंतागुंतीची होऊ शकतात.

भौगोलिक आणि सागरी दृष्टिकोनातून पाहिल्यास या कराराचे आणखी एक गंभीर परिमाण समोर येते, जे थेट आंतरराष्ट्रीय सागरी व्यापार मार्गांशी जोडलेले आहे. कतारचे स्थान पर्शियन गल्फमध्ये आहे, पाकिस्तानचे नियंत्रण अरबी समुद्रातील महत्त्वाच्या ग्वादर बंदरावर आहे, तर इंडोनेशिया मलाक्का आणि सुंदा सामुद्रधुनीवर भौगोलिक नियंत्रण ठेवतो. हे सर्व मार्ग जागतिक व्यापार आणि विशेषतः भारताच्या कच्चा तेलाच्या आयातीसाठी अत्यंत जीवनदायी मानले जातात. जर भविष्यात या चार देशांच्या नौदलांनी या सागरी चौक्यांवर संयुक्त सराव किंवा समन्वय वाढवला, तर हिंदी महासागरातील भारताच्या पारंपरिक वर्चस्वाला शह देण्याचा प्रयत्न होऊ शकतो. आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर काश्मीरसारख्या मुद्द्यांवर दबाव आणण्यासाठी पाकिस्तान या नव्या मंचाचा कसा वापर करतो, यावरही भारताचे बारकाईने लक्ष असेल; कारण तुर्की आणि पाकिस्तान सातत्याने अशा मुद्द्यांचे आंतरराष्ट्रीयीकरण करण्याचा प्रयत्न करत आले आहेत. इंडोनेशियाची या करारातील उपस्थिती म्हणजे भारताशी असलेले त्यांचे संबंध संपुष्टात आले असा निष्कर्ष काढणे घाईचे ठरेल. इंडोनेशियाचे परराष्ट्र धोरण ऐतिहासिकदृष्ट्या 'अलिप्ततावादी' आणि स्वतंत्र राहिले आहे.

ते कोणत्याही एका देशाच्या किंवा लष्करी आघाडीच्या आहारी जात नाहीत. भारतासोबत इंडोनेशियाचा व्यापार अब्जावधी डॉलर्सचा असून कोळसा, पाम तेल आणि अन्नधान्याच्या पुरवठ्यासाठी दोन्ही देश एकमेकांवर अवलंबून आहेत, ज्याची भरपाई पाकिस्तान किंवा तुर्की कधीही करू शकत नाहीत. इंडोनेशियाचा या करारातील सहभाग हा प्रामुख्याने स्वतःच्या देशांतर्गत संरक्षण उद्योगाचा विकास करणे आणि परवडणारे तंत्रज्ञान मिळवणे यापुरताच मर्यादित असल्याचे दिसते. तरीही, या घडामोडी भारताला आत्मसंतुष्ट राहू देत नाहीत. भारताला आपल्या अॅक्ट इस्ट धोरणाला अधिक गती देत, इंडोनेशियाशी द्विपक्षीय राजकीय व लष्करी संवाद वाढवावा लागेल, ब्रह्मोससारखे संरक्षण प्रकल्प तातडीने मार्गी लावावे लागतील आणि त्याचवेळी अंदमान-निकोबारमधील स्वतःची लष्करी सज्जता वाढवून हिंदी महासागरातील कोणत्याही नव्या आव्हानाला तोंड देण्यासाठी पूर्णपणे सज्ज राहावे लागेल.

- ९५६१५९४३०६

भारत -न्यूझीलंड विश्वविक्रमी सामन्यात भारताच्या कपाळी विजयी तिलक

डॉ. दत्ता विघावे क्रिकेट समिक्षक

दुसऱ्या टी२० सामन्यात भारताने न्यूझीलंडला चार गडी राखून पराभूत केले. क्राइस्टचर्चमध्ये, अभिषेक शर्मा पॉवरप्लेमध्ये १०० षटकार मारणारा पहिला फलंदाज ठरला. अर्शदीप सिंगनेही भुवनेश्वर कुमारला मागे टाकत, एका वर्षात भारतासाठी सर्वाधिक टी२० बळी घेण्याचा विक्रम प्रस्थापित केला. या सामन्यात, १६ व्या षटकात नितीश रेड्डी आणि तिलक वर्मा यांनी सलग चार चेंडूवर प्रत्येकी दोन धावा घेतल्या. १९ व्या षटकात तिलकने मारलेल्या षटकाराने डगआऊटमधील भारतीय खेळाडूंना आनंदाने उड्या मारायला लावल्या.

भारत-न्यूझीलंड सामन्यातील प्रमुख विक्रम व सुवर्ण क्षण

अभिषेकने रोहितला मागे टाकले. अभिषेक टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्याच्या पहिल्या सहा षटकांमध्ये १०० षटकार मारणारा जगातील पहिला फलंदाज ठरला. त्याने तिसऱ्या षटकात मॅट हेन्रीच्या गोलंदाजीवर षटकार मारून हा पराक्रम केला. ९८ षटकारांसह रोहित शर्मा दुसऱ्या स्थानावर आहे.

एका वर्षात सर्वाधिक झेल घेणारा खेळाडू तिलक ठरला

शनिवारी तिलकने भुवनेश्वर कुमारच्या गोलंदाजीवर डॅरिल मिचेलचा झेल घेतला. यामुळे वार्षी टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमधील त्याच्या झेलांची एकूण संख्या २६ झाली. त्याने इंडोनेशियाच्या डॅनियलसन हावोचा २५ झेलांचा विक्रम मोडत, एका कॅलेंडर वर्षात सर्वाधिक झेल घेणारा क्षेत्ररक्षक बनण्याचा मान मिळवला.

अर्शदीपने वार्षी ३८ टी-२० आंतरराष्ट्रीय बळी घेतले

अर्शदीप सिंग भारतासाठी एका वर्षात सर्वाधिक टी२० आंतरराष्ट्रीय बळी घेणारा गोलंदाज ठरला आहे. त्याने वार्षी ३८ बळी घेतले आहेत. यापूर्वी हा विक्रम भुवनेश्वर कुमारच्या नावावर होता. त्याने २०२२ मध्ये ३७ बळी घेतले होते.

७० धावांत ५ गडी गमावून भारताचा सर्वोच्च धावांचा पाठलाग

भारताने ७० धावांत ५ गडी गमावून १८१ धावांचे लक्ष्य पूर्ण केले. या स्थानानुसार, टी२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताचा हा सर्वोच्च यशस्वी धावांचा पाठलाग आहे. या विक्रमात भारत संघांमध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहे. २०२२ मध्ये पापुआ न्यू गिनीने ५३ धावांत ५ गडी गमावून २०४ धावांचे लक्ष्य पूर्ण केले.

सँटनरने भारताविरुद्ध दुसऱ्यांदा ४ बळी घेतले

मिचेल सँटनर टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांमध्ये भारताविरुद्ध एकापेक्षा जास्त वेळा ४ बळी घेणारा पहिला गोलंदाज ठरला आहे. त्याने शनिवारी क्राइस्टचर्च येथे ४ षटकांत २१ धावा देऊन ४ बळी घेतले. यापूर्वी, त्याने २०१६ च्या टी-२० विश्वचषकादरम्यान नागपूरमध्ये भारताविरुद्ध चार बळी घेतले होते. तो सामना न्यूझीलंडने १२७ धावांचे लक्ष्य वाचवून जिंकला होता.

सामन्यातील लक्षवेधक घटना व निर्णायक क्षण

तिलकच्या षटकारावर डगआऊटमधील भारतीय खेळाडूंनी उड्या मारल्या. भारताला शेवटच्या ७ चेंडूंमध्ये विजयासाठी १७ धावांची गरज होती. नॅथन स्मिथच्या षटकात, टिळक वर्मानें स्लोअर बॉलवर वाईड लाँग-ऑफच्या दिशेने षटकार मारला. त्याच्या या फटक्याने डगआऊटमधील भारतीय खेळाडू आनंदाने उड्या मारू लागले आणि त्यांनी टाळ्या वाजवल्या. तिलकने २६ चेंडूंमध्ये नाबाद ५१ धावा केल्या.

सामना जिंकल्यानंतर तिलक वर्माचा आनंदोत्सव

नितीश आणि तिलकने एका षटकात चार दुहेरी धावांसह १३ धावा केल्या नितीशने नॅथन स्मिथच्या १६व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर चौकार मारला. त्यानंतर त्याने पुढच्या चार चेंडूंवर टिळकसोबत प्रत्येकी दोन धावा केल्या. षटकाच्या शेवटच्या चेंडूवर एक धाव आली. अशाप्रकारे, भारताने या षटकात १३ धावा केल्या. हे षटक महत्त्वाचे होते कारण भारताला शेवटच्या ५ षटकांमध्ये ६८ धावांची गरज होती. याचा अर्थ प्रत्येक षटकात १३ पेक्षा जास्त धावांची गरज होती. तिलक आणि नितीश यांनी सातव्या विकेटसाठी ३० चेंडूंमध्ये नाबाद ६९ धावांची भागीदारी करून भारताला विजय मिळवून दिला.

श्रेयस अय्यरने जेकब्सचा झेल सोडला

भारतीय कर्णधार श्रेयस अय्यरने ११ व्या षटकाच्या तिसऱ्या चेंडूवर बेवॉन जेकब्सचा झेल सोडला. प्रिन्स यादवच्या एका आखूड चेंडूवर जेकब्स पुढे सरसावला आणि त्याने मिड-ऑफच्या दिशेने फटका मारला. चेंडू बॅटच्या मधोमध न लागता श्रेयसच्या दिशेने गेला, पण तो त्याला पकडू शकला नाही. त्यावेळी जेकब्स २० धावांवर फलंदाजी करत होता.

नो-बॉलमुळे अभिषेक शर्मा झेलबाद होण्यापासून बचावला

दुसऱ्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर अभिषेक शर्मा बाद होण्यापासून बचावला. त्याच्या बॅटची वरची कड जेकब डफीच्या चेंडूला लागली आणि चेंडू हवेत उडाला. डीप स्क्वेअर लेगला नॅथन स्मिथने झेल घेतला, पण पंचांनी तो नो-बॉल ठरवला, ज्यामुळे अभिषेकला जीवदान मिळाले. डफीचा पुढचा पाय क्रीजच्या बाहेर असल्यामुळे चेंडू नो-बॉल घोषित करण्यात आला.

झेल घेतल्यानंतर सँटनरने सीमारेषा ओलांडली

तिसऱ्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर संजू सॅमसन बाद होण्यापासून बचावला. सॅमसनने लॉकी फर्ग्युसनच्या गोलंदाजीवर लाँग-ऑफच्या दिशेने फटका मारला. मिचेल सँटनर धावत आला आणि त्याने चेंडू पकडला, पण झेल घेताना त्याचा पाय सीमारेषेच्या दोरीला लागला, ज्यामुळे षटकार झाला. नियमांनुसार, सॅमसनने आपली विकेट गमावण्याऐवजी सहा धावा मिळवल्या. सँटनरचा पाय सीमारेषेला लागल्याने सॅमसनला ६ धावा देण्यात आल्या.

जेकब्सने नमन धीरचा सोपा झेल सोडला

१२ व्या षटकाच्या पहिल्याच चेंडूवर नमन धीरला जीवदान मिळाले. त्याने मिचेल सँटनरच्या चेंडूवर ड्राईव्ह करण्याचा प्रयत्न केला, पण चेंडू त्याच्या बॅटच्या बाहेरील कडेला लागून बॅकवर्ड पॉइंटच्या दिशेने गेला. बेवॉन जेकब्सला तो झेल पकडता आला नाही आणि चेंडू त्याच्या हातातून निसटला. त्यावेळी नमन ५ चेंडूंमध्ये ९ धावांवर खेळत होता.

पुरुषांच्या सामन्यातील पहिली महिला पंच

पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय टी-२० सामन्यात ऑन-फील्ड (मैदानावर) मुख्य पंच म्हणून पंचगिरी करणारी पहिली महिला पंच न्यूझीलंडची किम कॉटन ही आहे. किम कॉटन यांनी ५ एप्रिल २०२३ रोजी डुनेडिन येथे न्यूझीलंड आणि श्रीलंका यांच्यात खेळल्या गेलेल्या पुरुषांच्या टी-२० सामन्यात ही ऐतिहासिक कामगिरी केली. आयसीसीच्या दोन पूर्ण सदस्य देशांमधील पुरुषांच्या आंतरराष्ट्रीय सामन्यात पंचगिरी करणाऱ्या त्या पहिल्या महिला पंच ठरल्या.

- ९०९६३७२०८२

वीर बाबुराव शौर्यकथा : आमचा चिरस्थायी वारसा

कृष्णकुमार निकोडे गडचिरोली

वीर बाबुराव पुल्लेसूर शेडमाके (१८३३-१८५८) हे स्वातंत्र्यपूर्व काळातील एक बंडखोर आणि मध्य भारतातील गोंड समाजाचे प्रमुख होते. सन १८५७ च्या भारतीय बंडादरम्यान, त्यांनी चांदा- चंद्रपूर आत्ताच्या गडचिरोली जिल्ह्यात उठावाचे नेतृत्व केले. वासाठीच ते "वीर बाबुराव" म्हणून ओळखले जातात. सन १८५७च्या भारतीय बंडादरम्यान चांदा जिल्ह्यात झालेला उठाव गोंड कुटुंबात जन्मलेल्या वीर बाबुरावने सन १८५८ साली सात महिन्यांच्या संपूर्ण गोंडवाना प्रदेशात दरवर्षी त्यांचा जयंती दिवस-१२ मार्च आणि शहीद दिवस- २१ ऑक्टोबर साजरा केला जातो.

जीवन आणि कुटुंब: वीर बाबूराव यांचा जन्म दि.१२ मार्च १८३३ रोजी चांदा- चंद्रपूर जिल्ह्यातील अहेरी तहसीलच्या किष्टापूर गावात झाला. आत्ता हा गाव गडचिरोली जिल्हात येते. ते पुल्लेसूर बापू आणि जुर्जा कुंवर यांचे ज्येष्ठ पुत्र होते. पुल्लेसूर बापू हे अहेरी परगण्यातील मोलमपल्ली गावचे जमीनदार होते. वीर बाबुराव यांचे सुरुवातीचे शिक्षण गोटुलमध्ये झाले आणि नंतर त्यांना इंग्रजी शिक्षणासाठी रायपूरला पाठवण्यात आले. शिक्षण पूर्ण झाल्यावर ते मोलमपल्लीला परत आले आणि वयाच्या अठराव्या वर्षी त्यांचा विवाह राज कुंवर यांच्याशी झाला.

स्वतंत्रता बंडः ब्रिटिशांनी सन १८५४ मध्ये नागपूरच्या भोसलेकडून चांद्राचा कारभार ताब्यात घेतला. त्यांनी प्रशासन, महसूल आणि धार्मिक धोरणात अनेक बदल केले, जे स्थानिकांनी मोठ्या नाराजीने स्वीकारले. सन १८५७ चा भारतीय उठाव मे १८५७ मध्ये उत्तर भारतात सुरू झाला होता. वीर बाबुराव यांनी या संधीचा फायदा घेऊन सप्टेंबर १८५७ मध्ये सुमारे ५०० आदिवासी पुरुषांची तुकडी संघटित केली आणि आपले सैन्य "जंगम दल" स्थापन केले. मार्च १८५८ मध्ये त्यांनी ब्रिटिश प्रशासनाखाली असलेला राजगड परगणा ताब्यात घेतला. लवकरच या भागातील इतर जमीनदार विशेषतः अडपल्ली आणि घोटेचे जमीनदार व्यंकटराव हेही या बंडात त्यांच्यासोबत सामील झाले. या बंडाविषयी ऐकून चांद्याचे डेप्युटी कमिशनर कॅप्टन डब्ल्यू. एच. क्रायटन यांनी ते दडपण्यासाठी १७०० सैनिकांचे नेतृत्व केले. ब्रिटिशांची वीर शेडमाकेच्या सैन्याशी पहिली चकमक दि.१३ मार्च १८५७ रोजी नांदगाव-घोसरी गावाजवळ झाली. स्थानिक व गोंडबांधवांनी ही लढाई जिंकली आणि ब्रिटिशांचे मोठ्या प्रमाणात जीवित व साधनसामग्रीचे नुकसान केले. दोन्ही सैन्ये दि. १९ एप्रिल १८५७ रोजी सगनापूर येथे आणि दि. २७ एप्रिल १८५८ रोजी बामनपेठ येथे पुन्हा भिडली. शेडमेकच्या सैन्याने या दोन्ही लढाया जिंकल्या. दिनांक २९ एप्रिल १८५८ रोजी त्यांनी प्राणहिता नदीवरील चिंचडोह येथील एका टेलिग्राम कॅम्पवर छापा टाकला. ब्रिटिश सैन्याने त्यांचा पाठलाग केला, परंतु दि. १० मे १८५८ रोजी घोट गावात त्यांना सलग तिसऱ्यांदा पराभव पत्करावा लागला. या छाप्यात इतर जीवितहानीसह दोन ब्रिटिश टेलिग्राम कर्मचारी ठार झाले.

यशस्वी वीर बाबूरावांचे सहकारी व सैन्य गनिमी काव्यात पारंगत होते. त्यांनी धनुष्याचा चांगला वापर केला आणि काही प्रसंगी डोंगराच्या माथ्यावरून ब्रिटिश सैन्याचा दिशेने दगडही फेकले. शिवाय डोंगराळ प्रदेश आणि जंगलांमुळे ब्रिटिशांना पुढे जाणे कठीण झाले आणि त्यांना माघार घ्यावी लागली. लढायांचा फारसा उपयोग होत नसल्याने कॅप्टन क्रायटनने वीर बाबुराव शेडमाकेंना पकडण्यासाठी १००० रुपयांचे बक्षीस जाहीर केले आणि बंड दडपण्यासाठी ब्रिटिशांना पाठिंबा देण्याकरिता काही मोठ्या गोंड जमीनदारांवर दबाव आणला.

याचा फायदा झाला आणि अहेरी येथील लक्ष्मीबाई नावाच्या एका महिला जमीनदाराने विश्वासघात करून वीर बाबुरावांना क्रायटनसमोर हजर करण्याची जबाबदारी स्वतःवर घेतली. अखेरीस दि.१८ सप्टेंबर १८५८ रोजी लक्ष्मीबाईच्या सैनिकांनी त्याला पकडले आणि कॅप्टन क्रायटनच्या हवाली केले.

- ९६९९८३६७१७

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

'सप्तर्षी' पुरस्कारांनी सात मान्यवरांचा गौरव

हिंदू रिसर्च फाउंडेशनतर्फे भव्य आयोजन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

भारतीय ज्ञानपरंपरेचा गौरवशाली वारसा अधोरेखित करत साहित्य, कला, विज्ञान, तंत्रज्ञान आणि वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या सात मान्यवरांना हिंदू रिसर्च फाउंडेशन, मुंबई-नागपूरतर्फे प्रतिष्ठेच्या सप्तर्षी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. रविवारी कविकुलगुरू कालिदास सभागृहात पाचव्या सप्तर्षी पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. 'रिव्हिजिटिंग द ग्लोरियस पास्ट ऑफ भारतवर्ष' या संकल्पनेवर आधारित या सोहळ्यात प्रत्येक पुरस्कारार्थीला एक लाख रुपये रोख आणि सन्मानपत्र प्रदान करण्यात आले. जामनगर येथील जागतिक आरोग्य संघटनेच्या (डब्ल्यूएचओ) ग्लोबल ट्रेडिशनल मेडिसिन रिसर्च सेंटरच्या डेटा अँड इनोव्हेशन विभागाच्या युनिट प्रमुख डॉ. गीता कृष्णन जी. पिल्लई यांनी अध्यक्षस्थान भूषविले.

नवी दिल्ली येथील केंद्रीय संस्कृत विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. श्रीनिवास वरखेडी, सुरत येथील जीवदया फाउंडेशनचे किशोरभाई शाह, आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मैत्री यांच्यासह हिंदू रिसर्च फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. टी. एस. भाल, चेअरमन सुरेश कोते, भगवान राऊत आणि प्रीती रामकृष्णन मंचावर उपस्थित होते.

डॉ. टी. एस. भाल यांनी प्रास्ताविकातून पुरस्कारामागील भूमिका स्पष्ट केली. त्यांनी भारतीय सर्व आयआयटीच्या नावांसोबत ऋषीची नावे जोडून भारतीय परंपरेचा सन्मान करावा, असे आवाहन केले. सोबतच, रेड क्रॉस सोसायटीच्या धर्तीवर रेड स्वस्तिक सोसायटीला जागतिक आरोग्य संघटनेने मान्यता द्यावी, अशी मागणी केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अनिता तिळवे व रिचा सुगंध यांनी केले.

सात मान्यवरांचा सन्मान

महर्षी वाल्मिकी पुरस्कार - पद्मश्री भालचंद्र वि. नेमाडे : प्रख्यात मराठी साहित्यिक, कादंबरीकार, कवी, समीक्षक आणि विद्वान.

आर्यभट्ट पुरस्कार - पद्मश्री प्रा. व्ही. कामकोटी वीझिनाथन : प्रख्यात संगणकशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि आयआयटी मद्रासचे संचालक.

नागार्जुन पुरस्कार - पद्मश्री प्रा. थलप्पिल प्रदीप : प्रख्यात भारतीय शास्त्रज्ञ आणि आयआयटी मद्रासमधील प्राध्यापक.

विश्वकर्मा पुरस्कार - डॉ. अनिल रामजी सुतार : प्रख्यात वास्तुविशारद आणि शिल्पकार.

स्टॅच्यू ऑफ युनिटीच्या निर्मितीतील योगदानासाठी प्रसिद्ध.

आचार्य भारद्वाज पुरस्कार - सुयश सिंह : गॅलेक्सआय स्पेस सोल्यूशन्सचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि सहसंस्थापक.

आचार्य सुश्रुत पुरस्कार - डॉ. वेदप्रकाश मिश्रा : दत्ता मेघे इन्स्टिट्यूट ऑफ हायर एज्युकेशन अँड रिसर्चचे प्रो-चॅन्सेलर.

आचार्य कणाद पुरस्कार - प्रा. संजय जे. ढोबळे : भौतिकशास्त्राचे प्रख्यात प्राध्यापक.

भूतकाळातील चांगले पुढे नेणे आवश्यक - भालचंद्र नेमाडे

भूतकाळाचे महत्त्व जाणल्यामुळेच जगात आपले स्थान निर्माण होते. भूतकाळ विसरल्यास वर्तमानकाळही बिघडू शकतो. त्यामुळे परंपरेतील चांगल्या गोष्टी पुढे नेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक भालचंद्र वि. नेमाडे यांनी केले.

भारताची साहित्यिक, सांस्कृतिक आणि ज्ञानपरंपरा समृद्ध असून, हिंदू शब्दाकडे संकुचित दृष्टिकोनातून पाहू नये, असे त्यांनी सांगितले. विविध धर्म, परंपरा आणि धर्मग्रंथांचा व्यापक स्वीकार केल्यास देश अधिक समृद्ध होईल, असेही ते म्हणाले. भारतीय साहित्याने जगाला नवे विचार दिले असून, या सर्वसमावेशक सांस्कृतिक परंपरेचा प्रसार फाउंडेशनने करावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

भूतकाळ हा पाया असावा, अंतिम गंतव्य नव्हे - प्रा. थलप्पिल प्रदीप

भारतात केवळ वादविवाद झाले नाहीत, तर विचारांची देवाणघेवाणही सातत्याने होत राहिली. अनुत्तरित प्रश्न पुन्हा विचारण्याची आणि नव्याने शोध घेण्याची परंपरा आपण जपली पाहिजे. विचारांची विविधता हे आपले सामर्थ्य आहे. भूतकाळ हा आपला पाया असला पाहिजे, अंतिम गंतव्य नव्हे, असे प्रतिपादन प्रा. थलप्पिल प्रदीप यांनी केले.

भारतीय ध्यान परंपरेचे पोषण करण्याची गरज - प्रा. व्ही. कामकोटी वीझिनाथन

प्राचीन भारतातील ज्ञानपरंपरा तसेच गणित आणि क्वांटम विज्ञानातील योगदानाचा उल्लेख करत त्यांनी भारतीय वारशाचा अभिमान व्यक्त केला. प्रत्येकाने आपल्या मूळ गावाशी नाळ जोडून तेथील कुटुंबांचा शोध घ्यावा आणि किमान दोन मुलांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करावे. समाजासाठी हे मोठे योगदान ठरेल, असे आवाहन त्यांनी केले.

देशाच्या प्रगतीत तंत्रज्ञानाचे योगदान महत्त्वाचे - डॉ. अनिल रामजी सुतार

वडिल रामजी सुतार यांची देशातील सर्वांत मोठा पुतळा उभारण्याची इच्छा होती. ती स्टॅच्यू ऑफ युनिटीची निर्मिती केल्यामुळे पूर्ण झाल्याचे सांगत डॉ. अनिल सुतार यांनी, अंबाझरी येथे स्वामी विवेकानंद यांचा पुतळाही त्यांनी तयार केला असल्याचे सांगितले.

भारताच्या नावाने नवे तंत्रज्ञान निर्माण व्हावे - सुयश सिंह

आपल्या गावात पुरस्कार स्वीकारताना आनंद होत असल्याचे सांगत सुयश सिंह यांनी समाधान व्यक्त केले. उद्योजक होण्यासाठी सध्या अनुकूल वातावरण असून, भांडवल, व्यासपीठ आणि केंद्र सरकारचे पाठबळ उपलब्ध आहे. त्यामुळे नव्या संधींचा लाभ घ्यावा. परदेशी शास्त्रज्ञांची नावे घेण्याऐवजी भारताचे नाव उंचावणारे तंत्रज्ञान विकसित करणे, हा आमचा प्रयत्न आहे, असे ते म्हणाले.

भारतीय मूल्यांवर आधारित तंत्रज्ञान विकसित करावे - प्रा. श्रीनिवास वरखेडी

भारतीय जीवनपद्धती, जीवनदृष्टी आणि प्रज्ञेचा आधार घेऊन तंत्रज्ञान विकसित करण्याची गरज आहे. तंत्रज्ञानाचा वापर कोणत्या मूल्यांच्या आधारे केला जातो, हे महत्त्वाचे आहे. त्यामुळे भारतीय मूल्ये आणि धर्मदृष्टीशी सुसंगत तंत्रज्ञानाच्या विकासाला प्रोत्साहन दिले पाहिजे, असे प्रा. श्रीनिवास वरखेडी यांनी सांगितले.

सप्तर्षी पुरस्कार हा केवळ सन्मान नसून भारतीय ऋषी परंपरेचे स्मरण आणि तिच्या मूल्यांचे आचरण करण्याची संधी आहे. आपल्या नावासोबत प्राचीन ऋषी परंपरेचा संदर्भ जोडून हा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवावा, असे आवाहन त्यांनी केले.

साहित्य हे मानवतेचे प्राचीन तंत्रज्ञान - डॉ. गीता कृष्णन जी. पिल्लई

अध्यक्षीय भाषणात डॉ. गीता कृष्णन जी. पिल्लई यांनी मानवाने निर्माण केलेल्या गोष्टींमधून संस्कृतीची ओळख निर्माण होते, असे सांगितले. साहित्य हे मानवतेचे सर्वांत प्राचीन तंत्रज्ञान असून, ज्ञानाच्या जतनात आणि प्रसारात त्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. संगणकीय तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता मानवी जीवनासोबतच जगाकडे पाहण्याची दृष्टीही बदलत आहेत, असे त्यांनी नमूद केले.

थोडक्यात

तंबाखूमुक्त शाळांसाठी शिक्षकांना प्रशिक्षण, समुद्रपूरमध्ये कार्यशाळा संपन्न



दै. सिंहवाणी वृत्त, वर्धा

विद्यार्थ्यांमध्ये आरोग्याविषयी जनजागृती निर्माण करणे आणि त्यांना तंबाखूच्या दुष्परिणामांपासून दूर ठेवण्याच्या उद्देशाने सलाम मुंबई फाउंडेशनच्या वतीने पंचायत समिती सभागृह समुद्रपूर येथे 'तंबाखूमुक्त आरोग्यसंपन्न शाळा' या विषयावर तालुका स्तरीय शिक्षक प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेला विनोद पालवे, विस्तार अधिकारी (शिक्षण), संजय ढोक गट समन्वयक, सलाम मुंबई फाउंडेशनचे जिल्हा समन्वयक मोनिष अठुरकर उपस्थिती होते. राहुल महाबुधे विस्तार अधिकारी (शिक्षण), यांनी उपस्थित यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेत शिक्षकांना तंबाखूमुक्त आरोग्यसंपन्न शाळा अभियान, तंबाखू नियंत्रण कायदा, तंबाखू सेवनाने आरोग्यावर होणारे दुष्परिणाम आणि शाळा तंबाखूमुक्त करण्यासाठी आवश्यक निकष याबाबत सविस्तर प्रशिक्षण दिले. विद्यार्थ्यांमध्ये तंबाखूविरोधी जनजागृती निर्माण करणे, त्यांच्यामध्ये जीवनकौशल्ये विकसित करणे आणि शाळांमध्ये आरोग्यदायी वातावरण निर्माण करण्याच्या महत्त्वावर यावेळी भर देण्यात आला.

शिक्षक हे विद्यार्थ्यांसाठी आदर्श असतात. त्यामुळे शिक्षकांच्या माध्यमातून तंबाखूमुक्तीचा संदेश प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहोचवून समाजात व्यापक जनजागृती निर्माण करता येऊ शकते, हा संदेश या कार्यशाळेतून देण्यात आला. या कार्यशाळेच्या यशस्वी आयोजनासाठी नरेंद्र फरताडे, गजानन साटोणे, श्रीकांत कावटे, गजानन वैद्य, संदीप वाघमारे, अनिता उगे, दिनेश बारई यांनी सहकार्य केले. शिक्षकांच्या सकारात्मक सहभागाने आणि उत्स्फूर्त प्रतिसादाने कार्यशाळेची सांगता झाली.

'जंगोम' नाटकाने पाडली पाटणसावंगीकरांना भुरळ!

हजारोंच्या उपस्थितीत दोन अंकी नाट्यप्रयोगाला उत्स्फूर्त प्रतिसाद



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

तालुक्यातील पाटणसावंगी मेस्को माता मंदिर समितीच्या आयोजनातून आणि ददे फाउंडेशनच्या सहकार्याने शनिवारी (दि. २४ ऑक्टोबर) रात्री ८ वाजता मेस्को माता मंदिराच्या प्रांगणात 'जंगोम' या दोन अंकी नाटकाचा प्रयोग पार पडला. या नाट्यप्रयोगाला हजारो प्रेक्षकांनी उपस्थिती लावत उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हेमंतू रंगभूमीच्या ३० कलाकारांनी या नाटकात सहभाग घेतला. नाटकातून आदिवासी स्वातंत्र्यवीर बाबुराव शेडमाके यांचा गौरवशाली इतिहास, संघर्ष आणि शौर्य प्रभावीपणे सादर करण्यात आले. तसेच नक्षलवाद आणि माओवादाच्या उदयाची पार्श्वभूमी, त्यांचा विस्तार आणि त्याविरोधातील संघर्ष व नक्षलवादाचा नायनाट यांचे चित्रण करण्यात आले. नक्षलवादी हिंडमा माडवी याच्याशी संबंधित घटनांचाही नाटकात समावेश होता. या माध्यमातून सामाजिक जनजागृतीचा संदेश देण्यात आला.

या कार्यक्रमाला अतिरिक्त पोलीस अधीक्षक अनिल मस्के, उपविभागीय पोलीस अधिकारी सागर खर्डे, गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक दीपक जाधव, पुरुषोत्तम चौधरी, श्रीपंचमुखी देवस्थान समेती चे अध्यक्ष दिलिप कुकडे आणि नाटकाचे लेखक, दिग्दर्शक प्रवीण खापरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मेस्को माता मंदिर समितीतर्फे उपस्थित मान्यवरांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. ऐतिहासिक घटनांसह समकालीन सामाजिक प्रश्नांवर प्रकाश टाकणाऱ्या या नाट्यप्रयोगाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. मेस्को माता मंदिर समिती आणि ददे फाउंडेशनच्या पुढाकारातून हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पडला.

५२ वर्षीय व्यक्तीची गळफास घेऊन आत्महत्या, रामधन चौकातील घराच्या अंगणात आढळला मृतदेह

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

शहरातील रामधन चौक परिसरात ५२ वर्षीय व्यक्तीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रविवारी (२५ ऑक्टोबर) पहाटे उघडकीस आली. अशोक शंकर श्रीरामे असे मृताचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अशोक श्रीरामे हे रामधन चौकातील आपल्या राहत्या घरी एकटे राहत होते. दारूच्या व्यसनामुळे त्यांची पत्नी संगीता आणि मुलगा बेसूर येथे वेगळे राहत असल्याची माहिती आहे. २५ ऑक्टोबर रोजी पहाटे २ ते ३ वाजताच्या दरम्यान अशोक यांनी घराच्या अंगणातील जांभाच्या झाडाला पांढऱ्या दुपट्ट्याने गळफास घेतल्याचे तक्रारीत नमूद आहे. या प्रकरणी भिवापूर पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची (मर्ग) नोंद केली असून उपनिरीक्षक सचिन उरकुडे पुढील तपास करीत आहे. आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

वाराणसी एअरशो, राफेल-सुखोईच्या कसरती

वाराणसी : पंतप्रधान मोदींनी रविवारी वाराणसीतील नमो घाटावर एअर शो पाहिला. या शोमध्ये १०० विमानांनी सहभाग घेतला. यामध्ये राफेल आणि सुखोईसारख्या ५२ लढाऊ विमानांचाही समावेश होता. पंतप्रधान मोदींसोबत संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि मुख्यमंत्री योगी यांनीही एअर शो पाहिला. एअर शोमध्ये राफेल विमानाने कमी उंचीवर कसरती दाखवल्या. विमान वर जाताना अचानक खाली वळत होते, तर कधी गोल चक्कर मारत होते. त्याचप्रमाणे सुखोई-३० एमके आय विमानानेही कमी उंचीवर हवाई कसरती दाखवल्या. चेतक हेलिकॉप्टरने पुष्पवृष्टी केली.

१ नोव्हेंबरला दिल्लीत 'वोट बचाओ, देश बचाओ' महारॅली

नवी दिल्ली : आमचे वोट चोरले जात आहे आणि हे आम्ही कोणत्याही परिस्थितीत शांतपणे सहन करणार नाही अशा शब्दांत काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी मतदारांच्या हक्कांवरून केंद्र सरकार आणि भाजपवर निशाणा साधला आहे. मतदार याद्यांमधून नावे वगळण्यात आली, नियम-कायद्यांचे उल्लंघन करण्यात आले आणि प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठीमार करण्यात आला, असा आरोप करत राहुल गांधी यांनी १ नोव्हेंबर रोजी दिल्लीतील रामलीला मैदानावर आयोजित 'वोट बचाओ, देश बचाओ' जनमार्च आणि महारॅलीत सहभागी होण्याचे आवाहन केले आहे.

राहुल गांधी यांनी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म एक्सवर पोस्ट करत या आंदोलनाची माहिती दिली. मतदार याद्यांमधून नावे कापली गेली, नियम-कायदे मोडले गेले आणि प्रश्न विचारणाऱ्यांवर लाठ्या चालवण्यात आल्या. आता देश उत्तर देईल असा इशारा त्यांनी दिला आहे. मतदारांच्या हक्कांचे संरक्षण आणि लोकशाहीच्या रक्षणासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरावे, असे आवाहनही त्यांनी केले. राहुल गांधी यांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या १ नोव्हेंबर रोजी नवी दिल्लीतील रामलीला मैदानावर वोट बचाओ, देश बचाओ जनमार्च आणि महारॅली आयोजित करण्यात आली आहे. या आंदोलनात विद्यार्थी, शेतकरी, मजूर, महिला, तरुण आणि व्यापारी अशा समाजातील सर्व घटकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले आहे. लोकशाहीची चिंता असलेल्या प्रत्येक नागरिकाने या कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे सांगत राहुल गांधी यांनी मतदारांच्या हक्कांचा मुद्दा उपस्थित केला. 'मत तुमचे आहे, त्यामुळे ही लढाईही तुमची आहे,' अशा शब्दांत त्यांनी नागरिकांना आंदोलनात सहभागी होण्याचे आवाहन केले.

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाला भाऊ जांबुवंतराव धोटे यांचे नाव देण्यासाठी प्रयत्न करणार: नितीन गडकरी

विजया धोटे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने भेट घेऊन सादर केले निवेदन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूरला विदर्भवीर भाऊ जांबुवंतराव धोटे यांचे नाव देण्यासाठी प्रयत्न करण्याचे आश्वासन केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. माजी आमदार तथा भाऊंच्या पत्नी विजया धोटे यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने गडकरी यांची आज भेट घेऊन यासंदर्भात निवेदन सादर केले.

यावेळी भाऊंच्या कन्या ज्वाला जांबुवंतराव धोटे, अन्याय निवारण मंचाचे सदस्य अंजय्या अनपर्थी आणि भाजप आध्यात्मिक सेलचे महामंत्री चंद्रशेखर दुबे उपस्थित होते. विजया धोटे या महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री बॅरिस्टर रामराव आदिक यांच्या कन्या आहेत.

महाराष्ट्र विधानसभेवर पाच वेळा आणि लोकसभेवर दोन वेळा निवडून आलेल्या भाऊंनी शेतकरी, कामगार, विद्यार्थी आणि वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी सातत्याने संघर्ष केला. अकोला येथे डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठाच्या स्थापनेसाठी त्यांनी उभारलेले ऐतिहासिक आंदोलन विदर्भाच्या शैक्षणिक आणि कृषी विकासाच्या लढ्यात महत्त्वपूर्ण ठरले. पशुवैद्यकीय शिक्षणाच्या विस्तारासाठी तसेच नागपूर येथे मुख्यालय असलेल्या महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठाच्या स्थापनेसाठीही भाऊंनी सातत्याने पाठपुरावा केल्याचे असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

त्यांच्या कार्याशी संबंधित विद्यापीठाला त्यांचे नाव दिल्यास भावी पिढ्यांना त्यांच्या जनसेवेची आणि विदर्भाच्या विकासासाठी केलेल्या संघर्षाची प्रेरणा मिळेल, अशी भूमिका शिष्टमंडळाने मांडली.

यासोबतच भाऊंच्या सार्वजनिक जीवनाशी घनिष्ठ संबंध असलेल्या नागपूर आणि यवतमाळ या दोन्ही ठिकाणी प्रत्येकी एका महत्त्वपूर्ण सार्वजनिक पायाभूत सुविधा अथवा विकास प्रकल्पाला त्यांचे नाव देण्याची मागणीही करण्यात आली.

भाऊंच्या कार्याचा सन्मान हा त्यांच्या कुटुंबीयांसह त्यांच्या विचारांवर आणि कार्यावर प्रेम करणाऱ्या विदर्भातील असंख्य नागरिकांच्या भावनांना न्याय देणारा ठरेल, असे विजया धोटे यांनी निवेदनातून व्यक्त केले.

शिष्टमंडळाची मागणी ऐकून घेतल्यानंतर, यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून मंत्रिमंडळात निर्णय व्हावा, यासाठी प्रयत्न करणार असल्याचे गडकरी यांनी सांगितले.

शहरातील सर्व वॉशिंग सेंटर अन् जलतरण तलावांच्या तपासणीचे आयुक्तांनी दिले निर्देश

पाणीटंचाईवर मात करण्यासाठी आयुक्त डॉ. विपीन यांची तातडीची बैठक



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

नागपूर शहरात पुढील काळात पाण्याची टंचाई निर्माण होऊ नये आणि उपलब्ध जलसाठ्याचा अपव्यय टळावा यावा यासंदर्भात उपाय योजनेसाठी मनपा आयुक्त डॉ. विपीन यांच्या अध्यक्षतेखाली शनिवारी (ता.२४) बैठक पार पडली. बैठकीत पिण्याच्या पाण्याचा होणारा अपव्यय तात्काळ थांबवण्यासाठी शहरातील सर्व वाहने धुण्याचे केंद्र अर्थात वॉशिंग सेंटर आणि जलतरण तलावांची अर्थात स्विमिंग पूल सखोल तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त डॉ. विपीन यांनी दिले.

मनपाच्या छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय इमारतीतील आयुक्त सभा कक्षात पार पडलेल्या बैठकीत मनपाचे अतिरिक्त आयुक्त अंकित, अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., मुख्य अभियंता लीना उपाध्ये, प्रभारी अधीक्षक अभियंता राजेश दुफारे, सहाय्यक आयुक्त धनंजय जाधव, राजकुमार मेश्राम, प्रमोद वानखेडे, अशोक घरोटे, अनिकेत धोपट, अनुज कोपुलवार, सौरभ कावळे, कार्यकारी अभियंता श्री. श्रीकांत वाईकर, ओसीएलडब्ल्यूचे प्रतिनिधी कुशल अतकरे यांच्यासह जलप्रदाय विभागाचे इतर सर्व कर्मचारी प्रामुख्याने उपस्थित होते.

बैठकीत आयुक्त डॉ. विपीन यांनी शहरातील पाण्याचा होणारा अपव्यय तात्काळ थांबवण्यासाठी शहरातील सर्व वाहने धुण्याचे केंद्र आणि जलतरण तलावांची सखोल तपासणी करण्याचे निर्देश दिले. या ठिकाणी पिण्याच्या पाण्याचा नियमबाह्य व अवाजवी वापर होत असल्यास किंवा पाण्याची नासाडी आढळल्यास संबंधित चालकांवर व मालकांवर कडक कारवाई करण्याच्या सूचना ही त्यांनी यावेळी दिल्या.

तसेच संभाव्य पाणी टंचाईचा सामना करण्यासाठी विविध उपाययोजना करण्याचे करण्याचेही त्यांनी सुचविले. पिण्याच्या पाण्याचा वापर कार धुण्यासाठी, रस्ते धुण्यासाठी, बागकामासाठी, बांधकामाच्या कामांसाठी करताना आढळल्यास प्रत्येक घटनेसाठी ५ हजार रुपयांपर्यंत दंड आकारण्याचेही त्यांनी यावेळी निर्देश दिले. यावर्षी कमी पाऊस झाल्यामुळे नागपूर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या जलाशयांमध्ये केवळ ५८ टक्के साठा उपलब्ध आहे.

सणासुदीचा काळ असला तरी बेकायदेशीर जोडण्यांद्वारे पाणी घेणाऱ्यांविरुद्ध कठोर मोहीम राबविण्यात येणार आहे. अशा ग्राहकांना त्यांची जोडणी बेकायदेशीररित्या कायदेशीर करून घेण्याची संधी देण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांमध्ये तात्काळ शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. त्यानंतर बेकायदेशीर जोडणीच्या ठिकाणी मीटर बसवावेत आणि मीटरमध्ये छेडछाड झाल्याचे किंवा ती काढून टाकल्याचे आढळल्यास अशा दोषी ग्राहकांविरुद्ध पोलिसांमध्ये गुन्हे दाखल करण्यात यावे असेही त्यांनी सुचविले.

शहरातील सार्वजनिक विहिरींची स्वच्छता आणि सौर पंपांची स्थापना करून लघु पाणीपुरवठा योजनासुरू करण्याची सूचना यावेळी करण्यात आली.

जलाशयांमधून होणारा पाण्याचा वापर कमी करण्यासाठी, सध्याच्या विहिरींची प्रयोगशाळेत पाण्याची गुणवत्ता तपासून स्वच्छ करून एमईडीएच्या मदतीने सौर पंप बसविणे आणि लघु पाणीपुरवठा योजना कार्यान्वित करणे प्रस्तावित आहे. अशा योजनांमधून मिळणारे पाणी वाहनांची धुलाई, बागकाम इत्यादी पिण्या व्यतिरिक्त इतर कामांसाठी वापरता येईल.

भूजल सर्वेक्षण प्राधिकरणाच्या मार्गदर्शनाखाली जास्तीत जास्त पुनर्भरण संरचना निर्माण करणे, जीएसडीए यांच्या मदतीने विहीर आणि बोअरवेलचे पुनरुज्जीवन करण्यात यावे. योग्य ठिकाणी विकेंद्रित सांडपाणी प्रक्रिया केंद्र (एसटीपी) उभारण्याचे काम करण्यात येईल, जेणेकरून प्रक्रिया केलेले पाणी उद्याने, दुभाजकांमधील वृक्षारोपण, बांधकामाची कामे इत्यादींसाठी वापरता येईल. शहरातील जलवाहिन्यांमधून होणारी गळती तात्काळ दुरुस्त करण्याचे यावेळीही निर्देश त्यांनी दिले.

थोडक्यात

महाप्रसादाच्या भव्य वितरणासह साई बाबांच्या पुण्यतिथी सोहळ्याची सांगता



दै. सिंहवाणी वृत्त, सावनेर

दरवर्षीप्रमाणे, साई बाबा मंदिर ट्रस्टने शहरातील साई मंदिरात साई बाबांची पुण्यतिथी सप्ताह साजरा केला. मंगळवार, २०/१०/२०२६, पहाटे ४ ते ६: 'श्री' यांचा अभिषेक, हवन आणि पूजा, सकाळी ६ ते ७: श्री साई बाबांची आरती, सकाळी ७ ते दुपारी १२: श्री साई बाबांची पालखी मिरवणूक, दिंडी ध्वज, कलश मिरवणूक, भजनी समूह यांचा एकत्रित कार्यक्रम. दिंडीकरी - श्री संत भारती महाराज सांप्रदायिक हरिपाठ भजन मंडळ, म्हसेपठार (संचालक श्री महेश कावडकर), दुपारी १२ ते १ वाजेपर्यंतः आरती आणि साईबाबांचे दर्शन, अल्पोपाहार आणि बुधवार, सकाळी ८ ते ९: श्रींची पूजा आणि दुपारी ६ ते ६ वाजेपर्यंत श्री. श्री साई बाबा महिला भजन मंडळ, सावनेर, दुपारी ८ ते १०: भजने श्री विश्वकर्मा महिला भजन मंडळ, सावनेर, गुरुवार सकाळी ८ ते रात्री ९ : श्री साईबाबांची पूजा आणि आरती, रात्री ८ ते १०, रात्री ८ ते १० वाजताः भजन कला, शुक्रवारी कौटुंबिक भजन, लि. सकाळी ८ ते ९ श्री साईबाबांची पूजा व आरती, रात्री ८ ते रात्री १० वाजताः भजन - विठ्ठल रुक्मिणी भजन मंडळ, पांढुर्णा रोड, सावनेर, शनिवारी सकाळी ८ ते ९: श्री साई बाबांची पूजा आणि आरती. दुपारी ३ ते ६: गोपाल कला यांचे कीर्तन, परमपूज्य श्री हरिश्चंद्र वंजारी महाराज, म. लाडगाव, ता. काटोल, जि. नागपूर. सायंकाळी ६ ते ७: शनिवार, २४/१०/२०२६ रोजी सायंकाळी ७ ते १० या वेळेत श्री साई बाबांची पूजा, आरती आणि महाप्रसादाचे वाटप आयोजित करण्यात आले होते, ज्याचा हजारो साई भक्तांना लाभ घेतला.

श्री. साई बाबांची पालखी साई मंदिरापासून सुरू झाली आणि शहरातील मुख्य रस्ते - बाजार चौक, राम मंदिर रोड, होळी चौक, गांधी पुतळा - अवधूतवाडी, राजकमल चौक, मुख्य रस्ता यांमधून जाऊन पुन्हा साई मंदिरात परत आली. पालखीच्या मार्गावर विविध ठिकाणी पालखीची पूजा करण्यात आली आणि खाऊ, फळे व सरबत वाटण्यात आले.

'हिट्स ऑफ शाहरुख खान अँड माधुरी दीक्षित' संगीतमय कार्यक्रम २८ ऑक्टोबर रोजी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर,

स्वरतरंग आणि स्वरांकुर यांच्या संयुक्त विद्यमाने हिट्स ऑफ शाहरुख खान अँड माधुरी दीक्षित या विशेष संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन बुधवार, २८ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ६.३० वाजता शंकरनगर येथील साई हॉलमध्ये करण्यात आले आहे. बॉलिवूडचे लोकप्रिय अभिनेते शाहरुख खान आणि अभिनेत्री माधुरी दीक्षित यांच्या गाजलेल्या चित्रपटगीतांची सुरेल मैफल अनुभवण्याची संधी नागपूरकरांना मिळणार आहे.

या कार्यक्रमात प्रसिद्ध गायक निरंजन बोबडे, गौरी शिदे आणि अश्विन भोकरे हे शाहरुख खान व माधुरी दीक्षित यांच्यावर चित्रित लोकप्रिय गीते सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनश्री सेवारकर करणार आहेत. या विनामूल्य कार्यक्रमाच्या प्रवेशिका २७ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजेपासून सार्वटिफीक सभागृह, आठ रस्ता चौक, लक्ष्मीनगर येथून प्राप्त करता येतील. संगीतप्रेमींनी या संगीतमय कार्यक्रमाला मोठ्या संख्येने उपस्थित राहून आस्वाद घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

देवी मातेचा मुकुट चोरणारा अट्टल चोरटा नवीन कामठी पोलिसांच्या जाळ्यात

२० हजारांचा मुद्देमाल जप्त



दै. सिंहवाणी वृत्त, कामठी

नवीन कामठी पोलीस ठाण्याहद्दीतील कामठी अजनी मार्गावरील नवीन मोक्षधाम परिसरातील कालीमातेच्या मंदिरातून काली मातेचा चांदीचा मुकुट चोरणारा अट्टल चोरट्याला नवीन कामठी पोलीसानी अटक करून वीस हजार रुपयांच्या मुद्देमाल जप्त केल्याची कारवाई दिनांक २३ ऑक्टोंबर रोज शुक्रवारला केली. नवीन कामठी पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कामठी अजनी मार्गावरील नवीन मोक्षधाम परिसरातिल कालीमातेच्या मंदिरातून काली मातेच्या मूर्तीचे चांदीचे मुकुट किंमत वीस हजार रुपये अट्टल चोरटा धनराज नारायणस्वामी पिल्ले वय ३१ वर्ष राहणार सैलाब नगर कामठी यांनी १६ ऑक्टोबरला चोरून नेले होते. काली मातेच्या चांदीचा मुकुट चोरीला गेल्याची तक्रार नवीन कामठी पोलीस स्टेशनला होताच पोलिसांनी कलम ३०५ (ड),३११ (३) भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करून तपास सुरू केला असता गुप्त माहितीच्या आधारावर नवीन कामठी पोलीसानी धनराज नारायणस्वामी पिल्ले वास अटक करून त्याचे जवळून वीस हजार किमतीचे चांदीचे मुकुट जप्त केले. आरोपी धनराज नारायणस्वामी पिल्ले हा अट्टल चोरटा असून त्याचे जवळून अजून काही चोरीचे गुन्हे उघडकीस येणार असल्याचे नवीन कामठीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांनी सांगितले असून वरील कारवाई पोलीस उपायुक्त रमेश धुमाळ, सहाय्य पोलीस उपायुक्त अंकुश खेडकर, नवीन कामठीचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश आंधळे यांचे मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक योगेश नालटे, किशोर महंत, सुरेश ठाकूर, विवेक दोरसेटवार, आशिष बागडे, तुषार मोरे यांच्या पथकाने केली.

नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात निवेदनांची गर्दी

दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यक्रमात विविध मागण्यांच्या निवेदनांची गर्दी झाली. गडकरी यांची भेट घेण्यासाठी सकाळपासून नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित झाले होते. यावेळी अनुकंपा, बदली यासारख्या विषयांसह रस्त्यांच्या मागणीचे निवेदनही मंत्री महोदयांना





देण्यात आले.

महाल येथील गडकरी वाडा येथे गडकरी यांच्या जनसंपर्क कार्यालयात विविध संस्था, संघटनांचे लोक आपली निवेदने घेऊन पोहोचले. याशिवाय व्यक्तिगत समस्या मांडण्यासाठीही लोकांनी मंत्री महोदयांची भेट घेतली. यामध्ये विशेषत्वाने बदलीसाठी, अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी, नवीन रस्त्यांच्या मागणीसाठी लोकांनी निवेदने दिली. गडकरी यांनी निवेदने स्वीकारून लोकांचे म्हणणे ऐकून घेतले. यासोबतच मलवाहिन्या, वीजजोडणी आदींच्या संदर्भातील निवेदनेही नागरिकांनी दिली. दिव्यांग बांधवांनी कृत्रिम अवयवांसाठी निवेदने दिली. कुणाला पायाची तर कुणाला हाताची आवश्यकता आहे. त्यांना आवश्यक मदत करण्याच्यासंदर्भात कार्यवाही करण्याच्या सूचना गडकरी यांनी दिल्या. अनेकांनी वैद्यकीय मदतीसाठी देखील निवेदन दिले. कुणी उपचारासाठी तर कुणी औषधांसाठी सहकार्य करण्याची विनंती गडकरींना केली. त्याहष्टीने तातडीने मदत करण्याच्या सूचना गडकरी यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. अनेकांनी आपली प्रकाशित पुस्तके गडकरी यांना भेट दिली.

बांद्याच्या नैतिक मोरजकरला 'महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६' स्पर्धेत द्वितीय क्रमांक

'हासरा नाचरा पाऊस' कवितेतून कोकणातील पावसाचे देखणे चित्रण, सोशल मीडियावरील काव्यसादरीकरणाची राज्यस्तरावर दखल

दै. सिंहवाणी वृत्त, बांदा

बांदा येथील खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूलमध्ये इयत्ता नववीत शिकणाऱ्या नैतिक नीलेश मोरजकर याने काव्यसादरीकरणाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. काव्ययोग काव्यसंस्था, पुणे यांच्या वतीने आयोजित 'महाराष्ट्राचा लाडका कवी २०२६' या व्हिडिओ काव्यवाचन स्पर्धेत नैतिकने राज्यस्तरावर द्वितीय क्रमांक पटकावला आहे. त्याने सादर केलेल्या 'हासरा नाचरा पाऊस' या कवितेतून कोकणातील पावसाचे निसर्गरम्य चित्रण केले होते. त्याच्या या यशामुळे बांदा परिसरातून त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

कविता लेखन आणि काव्यसादरीकरणाची आवड असलेल्या नैतिकने आपल्या कल्पकतेच्या आणि प्रभावी सादरीकरणाच्या जोरावर या स्पर्धेत यश मिळविले.



स्पर्धेसाठी त्याने 'हासरा नाचरा पाऊस' ही कविता सादर केली. कोकणातील पावसाचे बदलते रूप, निसर्गातील चैतन्य आणि पावसामुळे खुलून येणारे परिसराचे सौंदर्य या कवितेतून मांडण्याचा प्रयत्न त्याने केला. कोकणच्या निसर्गाशी घट्ट नाते सांगणाऱ्या पावसाचे चित्र शब्दांतून उभे करत त्याने आपल्या काव्यप्रतिभेची झलक दाखवून दिली.

या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्पर्धकांना स्वतःची मराठी कविता सादर करून तिचा व्हिडिओ संस्थेकडे पाठविण्याची संधी देण्यात आली होती. या स्पर्धेत राज्यातील शेकडो कवींनी सहभाग घेतला होता. कवितेचा आशय, विषय, सादरीकरण तसेच सोशल मीडियावरील प्रेक्षकांचा प्रतिसाद या निकषांच्या आधारे विजेत्यांची निवड करण्यात आली. नैतिकने सादर केलेल्या 'हासरा नाचरा पाऊस' या कवितेने परीक्षकांसह रसिकांचेही लक्ष वेधून घेतले. त्याच्या सादरीकरणाची राज्यस्तरावर दखल घेत त्याला द्वितीय क्रमांकाने गौरविण्यात आले.

काव्ययोग काव्यसंस्था, पुणे यांच्या वतीने जाहीर करण्यात आलेल्या निकालात नैतिक मोरजकर याचा द्वितीय क्रमांकाच्या मानकऱ्यांमध्ये समावेश आहे. या स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिक, आकर्षक सन्मानचिन्ह आणि अक्षरधन देऊन गौरविण्यात येणार आहे.

या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा रविवार दिनांक २५ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातील सदाशिव पेठ येथील अक्षरवेल सभागृहात सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. या सोहळ्यात नैतिकला त्याच्या यशाबद्दल सन्मानित करण्यात येणार आहे.

नैतिकने शालेय शिक्षणासोबतच मराठी साहित्याची आवड जोपासली असून, कविता लेखन आणि सादरीकरणाच्या माध्यमातून आपली वेगळी ओळख निर्माण करण्यास सुरुवात केली आहे. 'हासरा नाचरा पाऊस' या कवितेतून कोकणच्या निसर्गाचे वैशिष्ट्यपूर्ण चित्रण करत त्याने आपल्या परिसरातील निसर्गसौंदर्य साहित्याच्या माध्यमातून व्यक्त केले. त्याच्या या यशामुळे खेमराज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

नैतिकच्या या यशाबद्दल त्याचे कुटुंबीय, शिक्षक, मित्रपरिवार आणि बांदा परिसरातून अभिनंदन होत असून, त्याच्या पुढील साहित्यिक वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

ट्रकच्या धडकेत दुचाकी चालकाचा घटनास्थळी मृत्यू, किल्ले कोलार परिसरातील घटना

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी जात असताना नागपूर देहगाव राष्ट्रीय महामार्गाच्या वळणावर वळण घेत असताना एका ट्रकच्या धडकेत



घटनास्थळी दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील किल्ले कोलार परिसरात २५ ऑक्टोबर रविवारला दुपारच्या सुमारास घडली त्यामुळे खापरखेडा परिसरात सर्वत्र शोककळा पसरली आहे. रवींद्र मनोहर वलोकर वय ५० रा वार्ड क्रमांक २ खापरखेडा असे मृतकाचे नाव आहे.

मृतक रवींद्र वलोकर यांनी मागील दोन वर्षा पूर्वी किल्ले कोलार टी पॉईंट परिसरात केस कर्तनयाचे दुकान सुरू केले होते रविवारला पत्नीला दुकानात सोडून दुपारी १२ वाजताच्या सुमारास नागपूर-सावनेर मार्गावर देहगाव (रंगारी) येथील रिलायन्स पेट्रोल पंपावर पेट्रोल भरण्यासाठी दुचाकी क्रमांक एमएच-४०-सीवाय-४८९५ ने जात होते राष्ट्रीय महामार्गावर असलेल्या वळणावर वळण घेत असताना भरधाव येणाऱ्या ट्रक क्रमांक एमएच-४९-एटी-९४८२ ने मृतक रवींद्रच्या दुचाकीला जबर धडक दिली. सदर घटनेत ट्रकने फरफटत नेल्याने त्यांच्या अंगाचे अक्षरशः चिथडे उडाले घटनास्थळीच रवींद्रचा मृत्यू झाला वायेळी ट्रकचालक घटनास्थळावरून पसार झाला मृतक रवींद्र वलोकर याना लखव्याचा आजार होता त्यामुळे त्यांच्याकडे ट्रीसायकल दुचाकी होती आर्थिक परिस्थिती जेमतेम असताना पत्नी व मृतक रवींद्र आपला स्वतःचा व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते

सदर घटनेची माहिती खापरखेडा पोलीसांना देण्यात आली घटनास्थळ गाठून पोलिसानी घटनास्थळ पंचनामा केला मृतक रवींद्रचे पार्थिव शवविच्छेदन करण्याकरिता हलविण्यात आले रवींद्रच्या पश्चात आई, भाऊ, बहीण,पत्नी व मुलगा असा मोठा आप्तपरिवार आहे खापरखेडा पोलिसानी गुन्ह्याची नोंद केली असून फरार ट्रकचालकाचा कसून शोध घेत आहे. नागपूर-सावनेर राष्ट्रीय महामार्ग परिसरात किल्ले कोलार परिसर खापरखेडा पोलीस स्टेशन हद्दीत आहे किल्ले कोलार परिसरात जाण्या येण्यासाठी वळण देण्यात आले आहे मात्र सदर वळण आता डेथ पॉईंट ठरत आहे.

किल्ले कोलार हत्याकांड प्रकरणातील दुसऱ्या आरोपीला अटक

आरोपीच्या पायातील चप्पल ठरली तपासात महत्वाचा धागा, खापरखेडा पोलिसांच्या प्रयत्नाला यश, पाच दिवसाची पोलीस कोठडी

दै. सिंहवाणी वृत्त, खापरखेडा

स्थानिक पोलीस स्टेशन हद्दीतील किल्ले कोलार प्रशांत कुंभारे हत्याकांड प्रकरणात दुसऱ्या आरोपीला अटक करण्यात खापरखेडा पोलिसानी यश मिळविले असून न्यायालयातून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळविली आहे सदर प्रकरणाच्या तपासात आरोपीच्या पायातील चप्पल महत्वाचा धागा ठरली आहे अतुल अरुण ठाकरे (वय ३७) रा. डी-२९ राय टाऊन, शिवाजी मैदान जवळ, इसासनी, नागपूर असे अटक करण्यात आलेल्या दुसऱ्या आरोपीचे नाव आहे. ३० मार्च २०२६ रोजी मध्यरात्री दरम्यान किल्ले कोलार परिसरात एका झोपडीत झोपलेल्या दोन भिक्षेकऱ्यांवर दगडाने हल्ला करण्यात आला होता. प्रशांत कुंभारे व फिरोज शेख गंभीर जखमी झाले होते. उपचारा दरम्यान १२ एप्रिल रोजी प्रशांत कुंभारे याचा मृत्यू झाला होता. या गुन्ह्याचा तपास करने पोलिसांसमोर आवाहन होते तब्बल सात महिन्यानंतर सदर हत्याकांडातील मुख्य आरोपी बाबू उर्फ अन्वर अल्ताफ शेख याला खापरखेडा पोलिसांनी अटक केली होती. मात्र घटनेपासून आरोपी अतुल फरार होता घटनास्थळावरून खापरखेडा पोलिसानी एक चप्पल जप्त केली होती. आरोपी व जखमी ताजबाग परिसरातील होते. त्यामुळे तपासाची चक्रे ताजबाग परिसरात फिरविली असता एका महिलेने आरोपी अतुलची चप्पल असल्याचे ओळखले. सदर हत्याकांडात नेमकी हीच चप्पल टर्निंग पॉईंट ठरली खापरखेडा पोलीसांनी आरोपी अतुल ठाकरे यांचा शोध घेतला हॉटेल सेंटर पॉईंटमध्ये काम करत असल्याची माहिती मिळाली खापरखेडा पोलिसानी २३ ऑक्टोबर शुक्रवारला आरोपी अतुल ठाकरे याला ताब्यात घेऊन अटक केली.

आरोपी अतुल ठाकरे विरुद्ध बिएनएस १०३ (१) १०९, ३ (५) गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयातून पाच दिवसाची पोलीस कोठडी मिळविली आहे पुढील तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप बुवा करीत आहे.

गुणवत्ता आणि सुरक्षा ही केवळ संकल्पना नसून नैतिक गरज : पद्मश्री सत्यनारायण नुवाल

क्वालिटी कॉन्सेप्ट्सवरील ३७ व्या राष्ट्रीय संमेलनाचे उत्साहात उद्घाटन



दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर

गुणवत्ता ही केवळ एक संकल्पना किंवा घोषवाक्य नसून, ती प्रत्येकाच्या आचरणात उतरली पाहिजे. कोणत्याही क्षेत्रात ज्ञान, कौशल्य आणि अनुभव महत्त्वाचे असले, तरी त्यासोबत व्यक्तीची निष्ठा, उत्तरदायित्व, दृष्टिकोन आणि मनोधैर्य यांनाही तितकेच महत्त्व आहे. विशेषतः स्फोटके आणि दारूगोळा निर्मिती क्षेत्रात गुणवत्ता व सुरक्षेच्या बाबतीत कोणतीही तडजोड करता कामा नये, असे प्रतिपादन पद्मश्री सत्यनारायण नुवाल यांनी केले.

क्वालिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया (क्यूसीएफआय), नागपूर चॅप्टर आणि रामदेवबाबा विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने ३७व्या चॅप्टर कन्व्हेन्शन ऑन क्वालिटी कॉन्सेप्ट्स (सीसीक्यूसी-२०२६) चे उद्घाटन सोलर इंडस्ट्रीज इंडिया लिमिटेडचे अध्यक्ष पद्मश्री सत्यनारायणजी नुवाल यांच्या हस्ते करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.

वायेळी मंचावर श्री रामदेवबाबा सार्वजनिक समितीचे सरचिटणीस राजेंद्र पुरोहित, रामदेवबाबा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. राजेश पांडे, जेएसडब्ल्यू स्टील कोटेड प्रॉडक्ट्स लिमिटेड, कळमेश्वरचे प्लांट हेड अजय खंडेलवाल, क्यूसीएफआयचे अध्यक्ष अविनाश मिश्रा, संचालक अविनाश उपाध्याय आणि कार्यकारी संचालक डी. के. श्रीवास्तव उपस्थित होते. चेअरमन एमेरिटस, क्यूसीएफआय नागपूर चॅप्टर चे विवेक श्रौती, क्यूसीएफआय चे कार्यकारी संचालक ए. के. जैन तसेच क्यूसीएफआय नागपूर चॅप्टरचे सचिव विवेक जोशी उपस्थित होते. रामदेवबाबा विद्यापीठ येथे हा कार्यक्रम झाला. वायेळी संकल्प या स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले.

संरक्षण क्षेत्रातील बदलांचा उल्लेख करताना नुवाल त्यांनी सांगितले की, गेल्या काही वर्षांत युद्धपद्धतीत आमूलाग्र बदल झाले आहेत. ड्रोन, काऊंटर-ड्रोन प्रणाली, क्षेपणास्त्रे आणि लांब पल्ल्याची संरक्षण प्रणाली यांसारख्या तंत्रज्ञानाचे महत्त्व वाढले आहे. त्यामुळे या क्षेत्रात गुणवत्ता आणि तंत्रज्ञानाबाबत कोणतीही तडजोड करता येणार नाही. देशाला आत्मनिर्भर बनविण्यासाठी उत्पादन क्षमता आणि पायाभूत सुविधांसोबतच सक्षम मनुष्यबळ, कौशल्य आणि जबाबदार कार्यसंस्कृती विकसित करणेही आवश्यक आहे.

भारत सध्या 'विकसित भारत २०४७' च्या संकल्पासह एका महत्त्वाच्या टप्प्यावर उभा असून हे ध्येय साध्य करण्यासाठी देशातील मॅन्युफॅक्चरिंग क्षमता मजबूत करणे आणि R&D (संशोधन व विकास) वर विशेष भर देणे काळाची गरज असल्याचे अजय खंडेलवाल यांनी सांगितले.

आपल्याला जर 'व्हिजन २०४७: विकसित भारत, आत्मनिर्भर भारत' हे स्वप्न पूर्ण करायचे असेल आणि देशास जागतिक मॅन्युफॅक्चरिंग हब बनवायचे असेल, तर प्रत्येक क्षेत्रात उच्च गुणवत्तेचा अवलंब करणे अनिवार्य आहे, असे प्रतिपादन अविनाश मिश्रा यांनी केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ओम आणि ऋतिका यांनी केले तर आभार प्रदर्शन संजय कुलकर्णी यांनी केले.

थोडक्यात

आनंददायी शनिवार अंतर्गत जि.प. शाळा तोंडलीच्या विद्यार्थ्यांची गोबरगॅस संयंत्राला क्षेत्रभेट

विज्ञानाची प्रत्यक्ष अनुभूती, पर्यावरण संवर्धनाचा संदेश!



दै. सिंहवाणी वृत्त, किशोर साहू : मौदा

आनंददायी शनिवार अंतर्गत परिसर अभ्यास या विषयाच्या अनुषंगाने जि प शाळा तोंडली येथील विद्यार्थ्यांनी गावातील शामलाल धांडे यांच्या घरी असलेल्या गोबरगॅस संयंत्राला क्षेत्रभेट दिली. परिसर अभ्यास विषयात गोबरगॅस संयंत्राची थोडक्यात माहिती देण्यात आली होती. त्यानंतर विद्यार्थ्यांच्या मनात गोबरगॅस म्हणजे नेमके काय? त्याची निर्मिती कशी होते? संयंत्राची बांधणी कशी असते? त्याचा उपयोग कशासाठी केला जातो? असे अनेक प्रश्न निर्माण झाले.

विद्यार्थ्यांच्या या जिज्ञासेचे निरसन करण्यासाठी त्यांना प्रत्यक्ष गोबरगॅस संयंत्र दाखविण्यात आले. यावेळी संयंत्राची कार्यपद्धती, शेणापासून जैववायूची निर्मिती, स्वयंपाकासाठी होणारा त्याचा उपयोग तसेच संयंत्रातून बाहेर पडणाऱ्या अवशेषांचा खत म्हणून होणारा वापर याविषयी माहिती देण्यात आली. शामलाल धांडे यांनी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे देत त्यांना संयंत्राविषयी सविस्तर माहिती दिली. विज्ञान केवळ पुस्तकांपुरते मर्यादित नसून ते आपल्या दैनंदिन जीवनात कशा प्रकारे उपयोगी पडते, याची जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. गोबरगॅससारख्या पर्यायी ऊर्जास्रोतांमुळे पारंपरिक इंधनावरील अवलंबित्व कमी करण्यास मदत होते. तसेच सेंद्रिय पदार्थांचा योग्य वापर, कचऱ्याचे व्यवस्थापन, नैसर्गिक संसाधनांचे जतन आणि पर्यावरण संवर्धन यांचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगण्यात आले.

या वेळी मुख्याध्यापिका अनुराधा धुर्डे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना प्रत्यक्ष निरीक्षण, प्रश्नोत्तर आणि मुलाखतीच्या माध्यमातून ज्ञान संपादन करण्याचे महत्त्व स्पष्ट केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, निरीक्षण कौशल्य, प्रश्न विचारण्याची वृत्ती आणि पर्यावरणाप्रती जबाबदारीची भावना विकसित होण्यास मदत झाली. हा उपक्रम राबवण्यात सहशिक्षक निलेश जाधव यांचे सहकार्य लाभले. पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड देणारी ही क्षेत्रभेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञानवर्धक, आनंददायी आणि प्रेरणादायी ठरली.

नागपुर में एसी-फ्रिज वर्कशॉप में भीषण आग, कंप्रेसरों में धमाकों से दहशत!

चार महीने पहले शिकायत, फिर भी कार्रवाई क्यों नहीं? मनपा के अतिक्रमण विभाग पर उठे सवाल



दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर

सेंट्रल एवेन्यू रोड पर गीतांजलि टॉकीज चौक के पास लोढ़ीपुरा की घनी रिहायशी बस्ती में रविवार सुबह एसी-फ्रिज रिपेयरिंग वर्कशॉप में भीषण आग लग गई। वर्कशॉप में रखे कंप्रेसरों में धमाकों की आवाज से इलाके में अफरा-तफरी मच गई। दमकल विभाग की टीमों ने करीब दो घंटे की मशक्कत के बाद आग पर काबू पाया। सुबह करीब ८.३० बजे लगी आग तेजी से फैलने लगी। आसपास रिहायशी इमारतें होने के कारण लोगों में भय का माहौल बन गया। जानकारी के अनुसार, वर्कशॉप में रखे गैस सिलेंडरों को सुरक्षित बाहर निकालने की कार्रवाई भी की गई। आग लगने का वास्तविक कारण फिलहाल स्पष्ट नहीं है।

स्थानीय भाजपा पार्षद संजय कुमार बालपांडे का दावा है कि उन्होंने संबंधित वर्कशॉप के खिलाफ करीब चार महीने पहले मनपा के अतिक्रमण विभाग से शिकायत की थी। इसके बावजूद समय रहते कार्रवाई क्यों नहीं हुई, यह सवाल अब उठ रहा है। क्या शिकायत पर निरीक्षण किया गया था? क्या सुरक्षा व्यवस्था की जांच हुई थी? यदि शिकायत लंबित थी, तो इसके लिए जिम्मेदार कौन है? इन सवालों पर मनपा प्रशासन की प्रतिक्रिया सामने आना बाकी है।

इस घटना ने घनी रिहायशी बस्तियों में चलने वाली रिपेयरिंग वर्कशॉप की सुरक्षा और प्रशासनिक निगरानी पर गंभीर सवाल खड़े किए हैं। अब आग लगने के कारणों के साथ-साथ शिकायत पर हुई कार्रवाई की भी जांच जरूरी है। सवाल यही है—चार महीने पहले शिकायत मिलने के बावजूद कार्रवाई क्यों नहीं हुई? क्या मनपा प्रशासन जिम्मेदारी तय करेगा?

अमेरिका निवडणुकीत ऑपरेशन सिंदूर केंद्रस्थानी

वॉशिंग्टन/ नवी दिल्ली : अमेरिकेतील मध्यावधी निवडणुकांच्या तापलेल्या राजकीय वातावरणात भारताचे ऑपरेशन सिंदूर अचानक केंद्रस्थानी आले आहे. फ्लोरिडा येथे आयोजित प्रचारसभेत अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी थेट भारताच्या या लष्करी कारवाईचा आणि त्यानंतरच्या घडामोडींचा उल्लेख करत आपल्या एका इशाऱ्यामुळे दोन अण्वस्त्र सज्ज देशांमधील युद्ध टळल्याचा दावा केला. ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे अमेरिकेच्या निवडणुकीच्या आखाड्यात आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी आणि भारताच्या कारवाईची चर्चा पुन्हा जोरात सुरू झाली आहे. फ्लोरिडा येथील जाहीर सभेत बोलताना डोनाल्ड ट्रम्प यांनी स्वतःला शांततादूत म्हणून सादर केले. मतदारांना संबोधित करताना ते म्हणाले, भारत आणि पाकिस्तान या दोन्ही अण्वस्त्रधारी देशांमध्ये प्रचंड संघर्ष उसळला होता. दोन्ही देश कमालीचे संतापलेले होते. त्यावेळी मी त्यांना स्पष्ट सांगितले, जर तुम्ही हे थांबवले नाही, तर अमेरिकेशी व्यापार विसरून जा. मी दोन्ही देशांवर २५० टक्के प्रचंड टॅरिफ लादेन असे म्हटल्याचे त्यांनी सांगितले.

लोकसहभागातून धाम नदी घाटाची स्वच्छता, नदीने घेतला मोकळा श्वास!

कोशिष परिवाराचा पुढाकार





दै. सिंहवाणी वृत्त, पवनार

नवरात्रोत्सवानंतर धाम नदी घाट परिसरात साचलेला कचरा आणि निर्माल्य हटविण्यासाठी रविवारी राबविण्यात आलेल्या स्वच्छता अभियानाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. पवनार येथील विविध दुर्गा मंडळांचे सदस्य, युवक आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत नदीघाट स्वच्छ करण्यासाठी हातभार लावला. कोशिष परिवार, वर्धा यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमात पोकलेन यंत्राची मदत घेऊन नदीपात्रात साचलेला कचरा हटविण्यात आला. लोकसहभाग आणि यंत्रसामग्रीच्या मदतीने राबविलेल्या या मोहिमेमुळे नदीघाट परिसर स्वच्छ करण्याच्या प्रयत्नांना गती मिळाली.

नवरात्रोत्सवात दुर्गामूर्ती विसर्जनासाठी धाम नदी घाटावर मोठ्या संख्येने भाविक येतात. मात्र, विसर्जनानंतर निर्माल्य, प्लास्टिक, सजावटीचे साहित्य आणि अन्य कचरा नदीपात्रात तसेच घाट परिसरात साचतो. परिणामी नदीच्या स्वच्छतेचा प्रश्न निर्माण होतो. दरवर्षी उद्भवणाऱ्या या समस्येवर केवळ तात्पुरते उपाय करण्याऐवजी प्रत्यक्ष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय कोशिष परिवाराने घेतला. त्यानुसार रविवारी सकाळी आठ वाजल्यापासून स्वच्छता अभियानाला सुरुवात करण्यात आली. नागरिकांनी प्रत्यक्ष श्रमदान करीत नदीघाट स्वच्छ करण्यासाठी सहभाग नोंदविला. नदीपात्रात साचलेला कचरा आणि जमा झालेले निर्माल्य हटविण्यासाठी या यंत्राचा उपयोग करण्यात आला. नदीतील कचरा काढण्यासोबतच घाट परिसरातील अस्वच्छता दूर करण्यावर भर देण्यात आला. नागरिक आणि युवकांनी श्रमदान केले, तर पोकलेनच्या मदतीने कचरा हटविण्याचे काम करण्यात आले. त्यामुळे स्वच्छता मोहिमेला व्यापक स्वरूप प्राप्त झाले. नदीपात्रातील साचलेला कचरा हटविण्याचा या प्रयत्नामुळे धाम नदी घाट परिसराने मोकळा श्वास घेतल्याचे चित्र दिसून आले.

या अभियानासाठी पवनार ग्रामपंचायतचे माजी सरपंच अजय गांडोळे यांनी विशेष प्रयत्न केले. यावेळी पवनार ग्रामपंचायत प्रशासन, जिल्हा प्रशासन आणि नगरपरिषद प्रशासनाचेही सहकार्य लाभले. नदीची स्वच्छता ही केवळ एका संस्थेची किंवा प्रशासनाची जबाबदारी नसून नागरिकांच्या सामूहिक सहभागातूनच नदीचे प्रदूषण रोखता येऊ शकते, हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. दुर्गा मंडळांच्या सदस्यांनी आणि युवकांनी सामाजिक बांधिलकी जपत स्वच्छता मोहिमेत सहभाग घेतल्याने या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. सार्वजनिक ठिकाणांच्या स्वच्छतेसाठी नागरिक पुढाकार घेऊ लागल्यास प्रशासनाच्या प्रयत्नांनाही बळ मिळू शकते, हे या मोहिमेतून अधोरेखित झाले.

शेकडो ट्रक गाळाचा उपसा

पोकलेनच्या साहाय्याने धाम नदीपात्रात अनेक वर्षांपासून साचलेला गाळ काढण्यात आला. या स्वच्छता अभियानादरम्यान शेकडो ट्रक गाळ नदीपात्रातून बाहेर काढण्यात आल्याने नदीपात्र मोकळे करण्याचा कामाला गती मिळाली. कोशिष परिवार, नागरिक, युवक आणि दुर्गा मंडळांच्या सदस्यांच्या सहभागातून नदीघाट स्वच्छतेसाठी श्रमदान करण्यात आले. ग्रामपंचायत, जिल्हा प्रशासन आणि नगरपरिषद प्रशासनाच्या सहकार्याने राबविण्यात आलेल्या या उपक्रमामुळे धाम नदीच्या स्वच्छतेसाठी सामूहिक प्रयत्नांचे महत्त्व अधोरेखित झाले.

चंद्रपूर महानगरातील ३९० पैकी ३९० बूथवर 'मन की बात'चे श्रवण

आमदार किशोर जोरगेवार यांच्या पुढाकारातून 'मन की बात' जेन झी के साथ कार्यक्रमाचे आयोजन, भाजप महानगर कार्यालयासह सर्व बूथवर उत्स्फूर्त सहभाग



दै. सिंहवाणी वृत्त, चंद्रपूर-धनंजय पांढरे

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात' या लोकप्रिय संवाद कार्यक्रमाचे रविवारी चंद्रपूर महानगरातील सर्व ३९० बूथवर सामूहिक श्रवण करण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या चंद्रपूर महानगर कार्यालयासह महानगरातील ३९० पैकी ३९० बूथवर हा कार्यक्रम ऐकण्यात आला. महानगर कार्यालयात मन की बात जेन झी के साथ या आमदार किशोर जोरगेवार यांच्या उपस्थितीत आयोजित या उपक्रमात विद्यार्थी, युवक, युवती पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक सहभागी झाले होते.

'मन की बात' हा केवळ संवादाचा कार्यक्रम नसून देशातील सामान्य नागरिकांच्या प्रेरणादायी कायार्ची दखल घेणारा आणि समाजातील सकारात्मक उपक्रमांना प्रोत्साहन देणारा मंच आहे. या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी देशातील नागरिकांशी संवाद साधत विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्य, सामाजिक जाणीव आणि राष्ट्रनिर्मितीतील लोकसहभागाचे महत्त्व सांगतात. यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'मन की बात'मधून देशातील सामान्य माणसाच्या असामान्य कार्याची ओळख संपूर्ण देशाला होते. समाजात अनेक व्यक्ती कोणतीही अपेक्षा न ठेवता आपल्या परीने राष्ट्रनिर्मितीमध्ये योगदान देत असतात. अशा व्यक्तींच्या कायार्ची दखल घेत त्यांच्या प्रेरणादायी प्रवासातून इतरांनाही समाजासाठी काहीतरी करण्याची प्रेरणा मिळते.

आजची जनरेशन झेन झी अर्थात नव्या पिढीमध्ये प्रचंड ऊर्जा, कल्पकता आणि नवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची क्षमता आहे. या ऊर्जेला सकारात्मक दिशा मिळाली, तर देशाच्या विकासात तरुणांचे योगदान अधिक प्रभावी ठरू शकते. नव्या पिढीने देशाच्या परंपरा, संस्कृती आणि सामाजिक मूल्यांशी जोडलेले राहून आधुनिक भारताच्या उभारणीत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

चंद्रपूर महानगरातील सर्व ३९० बूथवर एकाच वेळी मन की बातचे श्रवण होणे हा कार्यकर्त्यांमधील समन्वय आणि लोकसहभागातून जनसंवाद पोहोचविण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचे यावेळी सांगण्यात आले. अशा उपक्रमांतून नागरिकांमध्ये सामाजिक जाणीव वाढण्यासह राष्ट्रहिताच्या कार्यासाठी प्रेरणा मिळते, असेही आमदार जोरगेवार यांनी सांगितले.

कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा जनसंवाद नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात आला. भाजप महानगर कार्यालयासह शहरातील सर्व बूथवर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याने महानगरात व्यापक स्तरावर मन की बातचे श्रवण झाले. यावेळी भारतीय जनता पार्टीचे माजी महानगर अध्यक्ष सुभाष कासनगोट्टूवार, राज्य कार्यकारणी परिषद सदस्य तुषार सोम, जेष्ठ नेते प्रकाश देवतळे, महामंत्री शाम कनकम, युवा मोर्चा उपाध्यक्ष उपाध्यक्ष रघुवीर अहिर, मंडळ अध्यक्ष प्रदीप किरमे, नगरसेविका सविता कांबळे, जेष्ठ नेते पूनम तिवारी, सुरेश तालेवार, प्रमोद शास्त्रकार, अध्यक्ष विद्यार्थी आघाडी प्रलय म्हशाखेत्री, महानगर एस.आय.आर. प्रमुख सुमित बेले, प्रिन्स प्रसाद, रंजन ठाकूर, राकेश बोमनवार, छाया चवरे, रीना साखरकर, मनीषा पडगेलवार आदिंची उपस्थिती होती.

वाढत्या महागाईविरोधात फ्रान्स पुन्हा पेटले!

पॅरिस : वाढती महागाई, आर्थिक विषमता आणि ढासळत्या सार्वजनिक सेवांच्या विरोधात संपूर्ण फ्रान्समध्ये असंतोषाचा ज्वालामुखी उफाळून आला आहे. शनिवारी संपूर्ण देशात ४ लाखांहून अधिक नागरिक रस्त्यावर उतरले आहेत. सरकारविरोधात जागोजागी आंदोलनं सुरू असून त्यांना रोखण्यासाठी पोलिसांनी अश्रूधुराच्या नळकांड्या फोडल्या, पाण्याचे फवारे मारले आणि लाठीमार केला.

गेल्या आठवड्यात झालेल्या हिंसेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी फ्रान्स प्रशासनाकडून आंदोलनाच्या ठिकाणी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तरीही उद्रेक रोखण्यात प्रशासनाला अपयश आले. फ्रान्सच्या अंतर्गत व्यवहार मंत्रालयाच्या माहितीनुसार, देशभरात सुमारे ४ लाख १० हजार आंदोलक रस्त्यावर उतरले होते. मात्र, कामगार संघटनांनी हा आकडा ८ लाखांच्या घरात असल्याचा दावा केला आहे. राजधानी पॅरिसमध्ये तर जनक्षोभाचा उद्रेक पाहायला मिळाला. एकट्या पॅरिसमध्येच १ लाख १० हजारांहून अधिक आंदोलकांनी मोर्चा काढला होता. सुरुवातीला शांततेत सुरू असलेल्या या मोर्चांच्या शेवटी आंदोलक आणि पोलिसांमध्ये जोरदार चकमक उडाली. आंदोलकांना पांगवण्यासाठी पोलिसांनी बळाचा वापर करत लाठीमार केला, अश्रूधूर सोडला आणि वॉटर कॅननचा (पाण्याचे फवारे) वापर केला. वाढत्या महागाईमुळे त्रस्त झालेल्या जनतेच्या क्रोधाने आता इमॅन्युएल मॅक्रॉन सरकार हादरले असून संपूर्ण फ्रान्स रणमैदान बनले आहे.

हे आंदोलन सुरुवातीला शाळांमधील असुविधा, निधीची कमतरता आणि शिक्षकांच्या तुटवड्याविरोधात विद्यार्थ्यांनी सुरू केले होते. मात्र, पाहता पाहता त्याला सामान्य जनतेच्या महागाई आणि वाढत्या इंधन दरांच्या तीव्र असंतोषाची जोड मिळाली आणि याचे रूपांतर देशव्यापी आंदोलनात झाले. वृत्तवाहिन्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पॅरिस, मार्सिले, लिओन, आणि नान्तस या शहरांमध्ये आंदोलक आणि पोलिसांमध्ये आमनेसामने संघर्ष झाला. आंदोलकांनी रस्त्यांवर बॅरिकेड्स उभारून वाहने आणि काही स्थानिक सरकारी कार्यालयांना (सिटी हॉल्स) आग लावली.वाढत्या आर्थिक विषमतेचा निषेध म्हणून आंदोलकांमधील काही हिंसक गटांनी बोर्डो येथील लुई व्हिटॉन, मार्सिलेमधील रोलेक्स आणि लिलममधील ॲपल स्टोअर यांसारख्या लक्झरी दुकानांमध्ये शिरून प्रचंड तोडफोड आणि लूटमार केली.

भिवापूरमधील १२ अंगणवाड्या दशकापासून अंधारात

२५ ते ३० हजारांचे वीजबिल थकीत, नूतनीकरणाच्या कामावरून सभापतींचा आक्षेप

दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर

शहरातील १२ शासकीय अंगणवाड्यांचा वीजपुरवठा मागील दहा वर्षांपासून खंडित असल्याची बाब समोर आली आहे. अवघ्या २५ ते ३० हजार रुपयांच्या थकीत वीजबिलामुळे बालकांना मूलभूत सुविधांपासून वंचित राहावे लागत असताना, दुसरीकडे अंगणवाडी इमारतींच्या नूतनीकरणाच्या कामावरून नगरपंचायत प्रशासन आणि महिला व समाजकल्याण सभापती यांच्यात मतभेद निर्माण झाले आहेत. सभापती रीना खापरीकर यांना विश्वासात न घेता नूतनीकरणाचे काम सुरू करण्यात आल्याचा आक्षेप घेत त्यांनी हे काम थांबविले.

भिवापूर शहरात एकूण १७ अंगणवाड्या असून, त्यापैकी पाच अंगणवाड्या भाड्याच्या इमारतींत सुरू आहेत. या ठिकाणी वीजपुरवठा सुरू आहे. मात्र, नगरपंचायतीच्या अखत्यारीतील शासकीय इमारतींमध्ये चालणाऱ्या १२ अंगणवाड्यांमध्ये गेल्या दहा वर्षांपासून वीज नाही. थकीत वीजबिलामुळे वीजपुरवठा खंडित झाल्याचे सांगण्यात येते. बालकांच्या पोषण आणि पूर्वप्राथमिक शिक्षणाशी संबंधित या केंद्रांमध्ये वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी प्रशासनाने आतापर्यंत काय प्रयत्न केले, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

नूतनीकरणाच्या प्राधान्यक्रमावरून वाद

अंगणवाडी इमारतींच्या नूतनीकरणासाठी सभापती रीना खापरीकर यांनी सर्वाधिक दुरुस्तीची गरज असलेल्या चार इमारतींची यादी नगरपंचायत प्रशासनाला दिली होती. या इमारतींच्या नूतनीकरणाला प्राधान्य देणे अपेक्षित असताना, दुसऱ्याच इमारतीचे काम सुरू करण्यात आल्याचा त्यांचा आक्षेप आहे. या कामाची पूर्वकल्पना आपल्याला देण्यात आली नसल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

प्रशासनाच्या या निर्णयावर नाराजी व्यक्त करत खापरीकर यांनी सूरू असलेले नूतनीकरणाचे काम शनिवारी थांबविले. त्यामुळे कामासाठी इमारतीची निवड कोणत्या निकषांवर करण्यात आली, तसेच सभापतींनी सुचविलेल्या चार इमारतींचा विचार का करण्यात आला नाही, असे प्रश्न निर्माण झाले आहेत.

प्रशासनाच्या नियोजनावर प्रश्नचिन्ह

एका बाजूला १२ अंगणवाड्यांचा वीजप्रश्न दशकभरापासून प्रलंबित आहे, तर दुसरीकडे नूतनीकरणाच्या कामाच्या निवडीवरून वाद निर्माण झाला आहे. थकीत वीजबिलाचा प्रश्न मार्गी लावून अंगणवाड्यांमध्ये वीजपुरवठा पूर्ववत करणे, तसेच सर्वाधिक दुरुस्तीची गरज असलेल्या इमारतींचे नूतनीकरण प्राधान्याने करणे आवश्यक आहे.

नगरपंचायत प्रशासन या प्रश्नांवर कोणती भूमिका घेते आणि अंगणवाड्यांमधील मूलभूत सुविधांसाठी कोणती कार्यवाही करते, याकडे आता लक्ष लागले आहे.